- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९० | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# महाराष्ट्राच्या 'दुष्काळावर' दिल्लीत चर्चा

## केंद्रीय कृषीमंत्री पथकासह पाहणीस येणार

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह अनेक मंत्र्यांनी दुष्काळ पाहणी दौरा केला असून मराठवाड्यासह, विदर्भात पाऊस नसल्याने भीषण परिस्थिती ओढवली आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या अहवालानुसार ट्रीगर १ परिस्थिती असलेल्या राज्यातील २५६ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, येथील शेतकऱ्यांना आणि नागरिकांना काही सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

एकीकडे राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरीही महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. त्याच, पार्श्वभूमीवर केंद्राचे पथकही दुष्काळ पाहणीसाठी महाराष्ट्रात येत आहे.

दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्याचा दौरा करणार असल्याची माहिती त्यांनी नवी दिल्लीतील पुसा येथील राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान २०२६ च्या उद्घाटन सत्रात दिली. ३ ऑक्टोबर नंतर केंद्रीय पथक महाराष्ट्रात दौरा करणार असल्याचे समजते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन हे उपलब्ध पाण्याचा ताळेबंद, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता लक्षात



घेऊन करण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री चौहान यांनी केले. पाणीटंचाई असलेल्या भागात कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. धान कापणीनंतर रिकाम्या राहणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या पिकांची लागवड वाढविण्यावर भर देण्यात आला.

रब्बी हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांचा आगाऊ आराखडा तयार ठेवण्याच्या तसेच शेतकऱ्यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. खतांचा संतुलित वापर करण्यासाठी 'खेत बचाओ' अभियान रब्बी हंगामातही राबविण्यात यावे, असे चौहान यांनी सांगितले. तसेच फार्मर आयडी, एग्रीस्टॅक आणि किसान क्रेडिट कार्डचे कव्हरेज वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### राज्यातील कृषीमंत्र्यांसोबत चर्चा

रब्बी हंगामात पेरणीची प्रगती, उगवण, रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजारभाव यांचा दर आठवड्याला आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचा केंद्रीय पथकाकडून प्रत्यक्ष आढावा घेतला जाणार असून, २९ सप्टेंबर रोजी सर्व राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत होणाऱ्या चर्चेत रब्बी हंगामासाठी समन्वित आणि परिणामाभिमुख कृती आराखडातयार करण्यात येणार आहे.

### कोकणातील शेतकऱ्यांच्या डोळ्यातही अश्रू

विदर्भ मराठवाड्यासह कोकणातही दुष्काळाची परिस्थिती पाहायला मिळत आहे. मात्र, रत्नागिरीत तीनच तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले असून करपलेल्या भातशेतीकडे पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आल्याचं दिसून आलं. पावसाअभावी हातची शेती गेल्याने चिपळूणसह इतर तालुक्यांनाही दुष्काळी मदतीची मागणी केली जात आहे. करपलेली भातशेती, डोळ्यांसमोर उभं राहिलेलं नुकसान आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात तरळलेले अश्रू! रत्नागिरी जिल्ह्यात केवळ तीन तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आल्याने चिपळूणमधील शेतकऱ्यांनी सरकारच्या निर्णयावर सवाल उपस्थित केला आहे.

सप्टेंबरअखेरपर्यंत अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांत भातशेती करपली आहे. बियाणे, खत आणि मजुरीवर केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. यंदा सरासरीच्या सुमारे ७५ टक्केच पाऊस झाल्याने पुढील काळात पाणीटंचाईचीही चिंता आहे. त्यामुळे चिपळूणसह इतर तालुक्यांचाही दुष्काळी निकषांमध्ये विचार करून तातडीने मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**थोडक्यात**

## मरेन, पण शरण नाही!

**छ. संभाजीनगर :** शासनाने मला कितीही त्रास देण्याचा प्रयत्न केला, दडपशाही केली किंवा माझ्याविरोधात षडयंत्र रचले तरी मी एक पाऊलही मागे हटणार नाही. मी मरेन; पण सरकारपुढे कधीही शरण जाणार नाही. गुलाम होण्यापेक्षा समाजाच्या हक्कासाठी लढता लढता मरणे मी पसंत करेन, असा अत्यंत आक्रमक आणि निवार्णीचा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी दिला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत असताना सोमवार दि. २८ सप्टेंबर रोजी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी तुरुंगात जाण्याची आमची पूर्ण तयारी असल्याचे स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर थेट राजकीय तोफ डागताना जरांगे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः माझ्याविरोधात बैठका घेत आहेत. तुम्ही कितीही लोक माझ्या अंगावर घातले तरी मी मागे हटणार नाही. आम्ही नेहमी फडणवीस साहेबांवर बोलत राहिलो; मात्र जे स्वतःला मित्र म्हणवत होते, तेच एकनाथ शिंदे आज आमचे शत्रू निघाले आहेत. आपण कोणालाही शरण जात नाही मॅनेज होत नाही आणि त्यांचे ऐकत नाही, म्हणूनच सत्ताधाऱ्यांना आपण वैरी वाटत असल्याचा घणाघात त्यांनी केला.

# ज्ञानेश कुमारांविरोधात काँग्रेसचे देशभरात आंदोलन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशातील विविध राज्यांमध्ये सोमवारी निदर्शने करण्यात आली. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, हरियाणा, छत्तीसगड आणि उत्तराखंडमध्ये काँग्रेस कार्यकर्ते निदर्शने करत आहेत.

उत्तर प्रदेशातील आग्रा येथे काँग्रेस कार्यकर्त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या घरावर काळी शाई फासली आणि लिहिले ज्ञानेश कुमार गद्दार, मत चोर. राजस्थानच्या जयपूरमध्ये शहीद स्मारक येथे सभा झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला. पोलिसांनी बॅरिकेडिंग करून काँग्रेस कार्यकर्त्यांना रोखले. पोलिसांनी माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि प्रदेश काँग्रेस अध्यक्ष



गोविंद सिंह डोटासरा यांच्यासह कार्यकर्त्यांवर वॉटर कॅननचा वापर केला.

लखनौमध्ये काँग्रेस कार्यकर्ते पोलिसांशी भिडले, काशीत महिला बांगड्या घेऊन पोहोचल्या होत्या. वाराणसीत काँग्रेसच्या आंदोलनादरम्यान महिला कार्यकर्त्यांनी बांगड्या घेऊन आंदोलन केले. मध्य प्रदेशात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या विरोधात भोपाळमध्ये काँग्रेसचे आंदोलन सुरू आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जीतू पटवारी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला घेराव घालण्यासाठी पोहोचले आहेत.

यादरम्यान पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. काही कार्यकर्ते बॅरिकेड्सवरही चढले.

बिहारमध्ये मतदार यादीतील कथित मतचोरी आणि लोकशाही अधिकारांशी केलेल्या छेडछाडीच्या निषेधार्थ काँग्रेसने आज देशभरात जिल्हास्तरावर आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे.बिहारमधील प्रत्येक जिल्ह्यातही काँग्रेस आक्रोश मार्च काढत आहे. पाटणा महानगर काँग्रेस समितीने कदमकुआं येथून आक्रोश मार्च काढण्यात आला. छत्तीसगडमधील दुर्गमध्ये काळे कपडे घालून काँग्रेसची रॅली काढण्यात आली दुर्ग आणि रायगडमध्ये काँग्रेस कलेक्टरेटला घेराव घालण्यासाठी रॅली निघाली होती.

हरियाणा काँग्रेस आज मतचोरीच्या आरोपावरून आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संपूर्ण प्रदेशात आंदोलन करत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डीसी कार्यालयांसमोर होणाऱ्या आंदोलनासाठी पक्षाने वेगवेगळ्या नेत्यांची नियुक्ती केली आहे.

उत्तराखंडमधील ८ जिल्ह्यांत मतचोरीविरोधात काँग्रेसचे आंदोलन सुरू आहे. डेहराडून, नैनीताल, हल्द्वानी, टिहरी, बागेश्वर, रुडकी, रुद्रपूर, उत्तरकाशी आणि पिथौरागढ येथे काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरून विरोध करत आहेत.

# सरकारी खर्चाला कात्री लावा!

**मुंबई :** राज्यासमोर आर्थिक संकटाबरोबरच दुष्काळाचे संभाव्य संकट उभे राहिले असताना शासनाने स्वतःच्या महसुली खर्चावर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेने केली आहे. पहिल्यांदा आमदारांचे मानधन भत्ते कमी करा असे संघटनेने म्हटले आहे. राज्यातील विकासकामांची हजारो कोटी रुपयांची देणी प्रलंबित असल्याने कंत्राटदार, विकासक आणि संबंधित बाजारपेठेवर त्याचा परिणाम होत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

सप्टेंबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो, या पार्श्वभूमीवर आगामी बारा महिने राज्यासाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी म्हटले आहे. विकासकामांची देणी वेळेत न मिळाल्यास बाजारातील पैशांचे चलनवलन मंदावून नवीन कामे आणि रोजगारनिर्मितीवर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर भोसले यांनी शासनासमोर दहा कलमी काटकसरीचा कार्यक्रम सुचविला आहे. विधानसभा, विधान परिषद आणि इतर लोकप्रतिनिधींचे वेतन ५० टक्क्यांनी कमी करावे, तसेच विविध भत्ते, प्रवास, निवास, दूरध्वनी आणि अन्य आर्थिक सुविधा १ ऑक्टोबर २०२६ ते जुलै २०२७ या कालावधीत स्थगित करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला आहे. मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठका महिन्यातून एक-दोन वेळा घेऊन खर्चात बचत करावी, मंत्री व लोकप्रतिनिधींचे अनावश्यक दौरे टाळून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासकीय कामकाज सुरू ठेवावे, तसेच शासकीय वाहने व अन्य सुविधांच्या वापरावर नियंत्रण आणावे, अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

# नागपुरात यंदाचा सप्टेंबर महिना ठरला दशकातील दुसरा सर्वाधिक कोरडा

## एल-निनोचा विळखा, ९९.५ मि.मी.पावसाची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपुरात यंदाचा सप्टेंबर महिना या दशकातील दुसरा सर्वात जास्त कोरडा सप्टेंबर महिना ठरला आहे. यंदा सप्टेंबर महिन्यात नागपुरात सरासरीच्या निम्माही पाऊस (फ्रंल्लां'' ॠ३) पडला नाही. नागपुरात सप्टेंबरमध्ये सरासरी १८३.७ मि.मी. पाऊस अपेक्षित होता. मात्र, प्रत्यक्षात केवळ ९९.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तर महिन्याचे उरलेले दोन दिवसही आता कोरडे जाण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. परिणामी यंदा सप्टेंबरची पावसाची सरासरी गाठणे देखील अशक्य झाले आहे.

दरम्यान, २०१८ मध्ये सप्टेंबरमध्ये सर्वात कमी ७०.६ मि.मी. पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर यंदाचा ९९.५ मि.मी. पाऊस दशकातील दुसऱ्या क्रमांकावरचा कमी पाऊस ठरला आहे. जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैच्या अखेरीस झालेल्या चांगल्या पावसाने काहीशी तूट भरून निघाली होती,



मात्र ऑगस्टमध्ये पुन्हा पावसाने दडी मारली. तर सप्टेंबरमध्येही अपेक्षित पाऊस न झाल्याने पावसाची तूट कायम असून १ जून ते २८ सप्टेंबरदरम्यान नागपुरात ९३२.६ मि.मी. पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात ६७५.४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच एक जून पासून आज पर्यंत नागपुरात पावसाची तूट २८% एवढी प्रचंड झाली आहे.

अशातच, यंदा पावसाळ्याच्या अखेरीसही पावसाने पाठ फिरवली. परिणामी जलसाठ्यांना अपेक्षित बळ न मिळाल्याने आता उपलब्ध पाणीसाठ्यावर पुढील महिन्यांची भिस्त राहणार आहे. त्यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. एकंदरीत या सगळ्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला आहे.सलग चार दिवस पुराचा फटका सहन केलेल्या भामरागड तालुक्यातील नागरिकांना सोमवारी रात्री नऊ वाजता मोठा दिलासा मिळाला आहे. रात्री नऊ वाजताच्या सुमारास पर्लकोटा नदी पुलावरील पाणी पूर्णपणे ओसरले असून हा मार्ग आता वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे.

कालपासून पूर ओसरायला सुरुवात झाल्याने मार्ग सुरू होईल या आशेने अनेक नागरिक प्रतीक्षेत होते. मात्र काल आणि आज दिवसभरही पाणी ओसरला नाही. अखेर आज रात्री नऊ वाजता पुलावरून पाणी ओसरल्याने प्रशासनाने पूल वाहतुकीसाठी सुरू केला आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# सामूहिक अत्याचार प्रकरणी माजी आमदाराचा अटकपूर्व जामीन फेटाळला

## नरेंद्र पवारांच्या अडचणीत वाढ



**वृत्तसंस्था, ठाणे**

शहरातील भिवंडी सामूहिक अत्याचार प्रकरणात माजी आमदार नरेंद्र पवार यांना न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळल्याने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. माजी आमदार नरेंद्र पवार व बडतर्फ पोलीस शैलेश पाटील यांच्या विरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. सत्र न्यायालयात नरेंद्र पवार यांच्या अटकपूर्व जमिनीवर फिर्यादी व तपाशी अधिकारी यांचे म्हणणे आज कोटार्ने ऐकले. त्यानंतर, आरोपी नरेंद्र पवार यांचा अटकपूर्व जामीन कोर्टाने फेटाळला. त्यामुळे, त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे.

आरोपी वकील आणि सरकारी वकील यांच्या युक्तिवादावर न्यायालयाने सुनावणी करताना दोन्ही पक्षाचे मुद्दे ऐकल्यानंतर कोर्टाने आज अटकपूर्व जामीनावर निर्णय दिला. त्यानुसार, भिवंडी तालुक्यातील सामूहिक अत्याचार प्रकरणात नरेंद्र पवार यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे, या प्रकरणात न्यायालयाच्या निर्णयामुळे आता पोलिसांच्या पुढील कारवाईकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. भिवंडी सत्र न्यायालयाने माजी आमदार नरेंद्र पवार यांचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळल्यानंतर काँग्रेसच्या गटनेच्या कांचन कुलकर्णी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सत्याचा विजय झाला आहे, आणि लोकशाही आजही जिवंत आहे त्याचं उदाहरण म्हणजे आज माजी आमदारांचा अटकपूर्व जामीन भिवंडी सत्र न्यायालयाने फेटाळला, असे कांचन यांनी म्हटले.

कल्याण शहरात मदत करण्याच्या बहाण्याने पीडित तरुणीस आपल्या कार्यालयात बोलावून तिला भिवंडी तालुक्यातील बापगाव येथे नेऊन तिच्यावर शारीरिक अत्याचार केल्या प्रकरणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि बडतर्फ पोलिस कर्मचारी शैलेश पाटील यांच्या विरोधात पडघा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर माजी आमदार नरेंद्र पवारांनी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला. तसेच, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देखील संदर्भात पत्र लिहिले. गुरुवारी पहाटे शस्त्राचा धाक दाखवून दारू पाजून सामूहिक शारीरिक अत्याचार केल्या प्रकरणी पीडीत तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर, कल्याण पश्चिमचे भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला.

# केंद्र सरकारचे आता 'चिंतन शिबिर २.०'

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

मोदी सरकार आता चिंतनाकडून कृतीकडे वाटचाल करत असून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या चिंतन शिबिर २.० मध्ये केंद्रीय मंत्र्यांसाठी एक सविस्तर कृती आराखडा (ॲक्शन प्लॅन) सादर केला जाणार आहे. २३-२४ सप्टेंबर रोजी सेवा तीर्थ येथे झालेल्या चर्चेच्या पहिल्या फेरीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या सूचना व त्या प्रक्रियेतून पुढे आलेल्या उद्दिष्टांवर आधारित हा आराखडा असेल. या माध्यमातून मंत्र्यांसाठी स्पष्ट संदेशच आहे. केवळ योजनांच्या अंमलबजावणी पुरते मर्यादित न राहता त्या पलीकडे जाऊन १०० टक्के व्याप्ती साध्य करा आणि केंद्र सरकारच्या सुमारे ४०-४५ प्रमुख कल्याणकारी योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी धोरणे तयार करा. मंत्र्यांना प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यास आणि नकारात्मक प्रचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. प्रत्येक मंत्र्याला सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रशासकीय अनुभव आणि शिकवण यांची नोंद करण्यास, तसेच त्यांचे आपल्या विभागासाठी प्रत्यक्ष कृतीयोग्य उपाययोजनांमध्ये रूपांतर करण्यास सांगण्यात आले आहे. प्रशासकीय लालफितीच्या कारभारात न अडकता लाभ लोकांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्यासाठी प्रत्यक्ष त्या क्षेत्रात उपस्थित राहण्यावर भर देण्यात आला आहे.

### कोणत्या मंत्र्यांचा असणार समावेश?

या चर्चेत सहभागी असलेल्या मंत्र्यांमध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह पियुष गोयल, हरदीपसिंग पुरी, शिवराजसिंह चौहान व अश्विनी वैष्णव यांचा समावेश आहे. त्यामुळे या सत्रात व्यापक सूचनांचे विभागनिहाय उद्दिष्टे, वितरण यंत्रणा व मोजमाप करता येईल.

संपादकीय लेखणीतून...

# दुष्काळ घोषित

राज्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने संकटात सापडलेल्या बळिराजाला दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने शुक्रवारी उशिरा आणि शनिवारी महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ घोषित केला. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी ७४ टक्के भाग दुष्काळाच्या छायेत आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक कर्जाची फेररचना, जमीन महसुलात सूट आणि कृषी पंपांच्या वीजबिलात सवलती यासारख्या उपाययोजनांची घोषणा केली आहे. शासकीय निर्णयानुसार राज्यातील ३२ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक ७४ तालुके दुष्काळग्रस्त आहेत. अमरावती विभागात ५६ तालुके, नाशिक विभागात ४९, नागपूर विभागात ३९, पुणे विभागात ३५, ठाणे/कोकण विभागात १२ तालुक्यांचा समावेश आहे. राज्य सरकारने दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ (सुधारित २०२०) अंतर्गत ट्रिगर-१ सक्रिय केला आहे. पावसातील २५ टक्क्यांहून अधिक तूट आणि लागोपाठ २१ दिवसांचा कोरडा काळ यामुळे ही प्रक्रिया लागू करण्यात आली आहे. पीक कर्जाची फेररचना आणि शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, ७.५ एचपीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल आधीच माफ करण्यात आले असून, त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या पंपांसाठी नवीन सवलती लागू होतील. दुष्काळग्रस्त भागातील शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, रोजगार हमी योजनेचे निकष शिथिल करून कामे उपलब्ध करणे, टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि चाऱ्याची सोय करणे आदी उपाययोजना सरकारने जाहीर केल्या आहेत.

कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केले की, उभी पिके डोळ्यादेखत जळताना पाहणे अत्यंत वेदनादायी आहे. सरकार केवळ दुष्काळ जाहीर करून थांबणार नाही, तर प्रत्येक बाधित शेतकऱ्यापर्यंत प्रत्यक्ष मदत पोहोचवेल. दुष्काळ जाहीर करण्याच्या निर्णयाचे स्वागत करतानाच, विरोधी पक्षांनी मदतीची वाट न पाहता तातडीने रोख आर्थिक सहाय्य देण्याची मागणी केली आहे. आगामी दसरा-दिवाळीचे सण लक्षात घेता, पंचनाम्याची वाट न पाहता शेतकऱ्यांच्या खात्यात प्रतिहेक्टरी १ लाख रुपये थेट जमा करावेत, संपूर्ण कर्जमाफी द्यावी, आगामी रबी हंगामासाठी मोफत बियाणे व खते उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी प्रदेश काँग्रेसने केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाने आधीच प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयांच्या तातडीच्या पॅकेजची मागणी केली होती. पंचनाम्याच्या नावाखाली प्रत्यक्ष मदत लांबणीवर टाकली जात असल्याची टीका पक्षाने केली. शिवसेना(उबाठा) पक्षाच्या नेत्यांनी दुष्काळग्रस्त भागाचा (सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना इ.) दौरा सुरू केला असून ही मदत कागदावर न राहता तातडीने प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे अशी मागणी केली. यंदा जून ते सप्टेंबर महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा १८.८ टक्के कमी पाऊस झाला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन यंत्रणा पूर्णपणे सतर्क करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील चिंताजनक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नांदेड, परभणी आणि बीड जिल्ह्यांना भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. या प्रसंगी त्या म्हणाल्या, मराठवाड्यातील परिस्थिती अत्यंत बिकट आणि कठीण आहे. पिके करपून किंवा वाळून गेली आहेत. पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चारा-पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीमुळे सर्वच घटक अडचणीत आले आहेत. नांदेड जिल्ह्यातील १६ पैकी १४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. परभणी जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यांचा यात समावेश आहे. राज्य सरकारने प्रशासनाला कोणतीही हयगय न करता अत्यंत पारदर्शक व वस्तुस्थितीदर्शक पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. दुष्काळ जाहीर करण्यात आल्याने प्रत्यक्ष पंचनाम्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात मदत पोहोचली जाईल. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या मुद्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. दुष्काळ जाहीर केल्यानंतरही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळण्याच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर टीका केली आहे. सरकारला जाग आणण्यासाठी मंत्र्यांच्या गाड्या अडवा, असे त्यांनी म्हटले आहे.



# व्यापाऱ्यांची अरेरावी आणि विद्रोहाचा वणवा

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

कधीकधी केवळ एका क्षणाचा राग आणि शोषणातून खदखदणारा असंतोष किती भयंकर विध्वंस घडवून आणू शकतो, याचा थरकाप उडवणारा पुरावा सुरतच्या 'श्याम संगिनी' कापड बाजारात नुकताच पाहायला मिळाला. ९ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्री लागलेली ही आग म्हणजे केवळ एक दुर्दैवी अपघात नव्हता, तर तो व्यवस्थेतील दोन टोकांच्या मानसिकतेचा झालेला भयानक स्फोट होता. अवघ्या १० हजार रुपयांच्या थकीत पगारापायी एका कर्मचाऱ्याने सूडाच्या भावनेतून रचलेला हा भीषण कट होता. या एका कटामुळे तब्बल १७ दुकाने जळून खाक झाली आणि एका रात्रीत व्यापाऱ्यांचे सुमारे २४ कोटी रुपयांचे अतोनात नुकसान झाले. एकीकडे पैशाच्या गुर्मीत कामगारांच्या श्रमाची किंमत शून्य मानणारी व्यापारी व्यवस्था आणि दुसरीकडे आपला हक्क मिळवण्यासाठी निष्पापांची संपत्ती बेचिराख करणारी विध्वंसक प्रवृत्ती, या दोन्ही बाबी समाज म्हणून आपल्याला अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत.

सुरत येथील 'श्याम संगिनी टेक्सटाइल मार्केट'मध्ये ९ सप्टेंबर २०२६ रोजी लागलेली भीषण आग हा अपघात नसून सूडापोटी केलेले कृत्य असल्याचे तपासात उघड झाले आहे. अवघ्या १० हजार रुपयांच्या थकीत पगारावरून माजी कर्मचाऱ्याने ही आग लावल्याचे निष्पन्न झाले आहे. सुरत गुन्हे शाखेने या प्रकरणी विनोद सावळे (वय ३३) या माजी अकाऊंटंटला अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, थकीत पगार आणि कामाच्या ठिकाणी झालेल्या कथित अपमानामुळे संतापलेल्या आरोपीने ८ सप्टेंबरच्या मध्यरात्री १५० रुपयांचे पेट्रोल आणून दुकानाबाहेरील मालाला आग लावली. आगीने रौद्ररूप धारण केल्याने १४ ते १७ दुकाने जळून खाक झाली. या घटनेत व्यापाऱ्यांचे तब्बल २४ कोटी रुपयांचे कापड आणि इतर माल जळून खाक झाला. अवघ्या १० हजारांच्या वादापायी कोट्यवधींची संपत्ती बेचिराख झाल्याने सुरतच्या व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेच्या मुळाशी गेल्यास तपासातून अत्यंत धक्कादायक वास्तव समोर येते. सुरतच्या या गजबजलेल्या बाजारातील ६ व्या मजल्यावरील हनुमान प्रसाद झंवर यांच्या दुकानात विनोद पंडित सावळे हा ३३ वर्षीय तरुण हिशोबनीस म्हणून काम करत होता. ३० हजार रुपये महिना पगारावर काम करणाऱ्या विनोदचे मालकासोबत काही कारणांवरून खटके उडाले. कामाच्या ठिकाणी होणारा कथित अपमान आणि वागणुकीला कंटाळून त्याने ती नोकरी सोडली. मात्र, नोकरी सोडताना त्याचे १० हजार रुपये मालकाकडे थकीत होते. या हक्काच्या पैशांसाठी त्याने वारंवार तगादा लावला, विनवण्या केल्या, पण मालकाने त्याला दाद दिली नाही. याच अपमानाचा आणि अन्यायाचा बदला घेण्यासाठी ८ सप्टेंबरच्या रात्री विनोदने अवघ्या १५० रुपयांचे पेट्रोल एका पिशवीत आणि बाटलीत विकत घेतले. रात्री ९ च्या सुमारास तोंडाला रुमाल बांधून तो बाजारात पोहोचला आणि आजूबाजूला शांतता पसरण्याची वाट पाहत ५ व्या मजल्यावर अंधारात दबा धरून बसला. अखेर मध्यरात्री १२.३० च्या सुमारास, जेव्हा संपूर्ण परिसर निर्मनुष्य झाला, तेव्हा त्याने ६ व्या मजल्यावरील दुकानाबाहेर ठेवलेल्या कापडाच्या गाठोड्यांवर पेट्रोल शिंपडले आणि एका क्षणात आगीची ठिणगी टाकली.

कापड बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावर कापड, धागे आणि ज्वलनशील साहित्य असल्याने या आगीने काही मिनिटांतच रौद्ररूप धारण केले. बघता बघता आगीने शेजारच्या दुकानांनाही आपल्या भयानक विळख्यात घेतले. अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या खऱ्या, पण आगीचा प्रकोप इतका भीषण होता की ती पूर्णपणे विझवण्यासाठी तब्बल ३८ तास सलग संघर्ष करावा लागला. घटनेनंतर सुरत पोलिसांच्या गुन्हे शाखेने 'विश्वास' प्रकल्पांतर्गत बसवलेले तब्बल १५०० हून अधिक सुरक्षा कॅमेरे तपासले आणि या चित्रफितीमधून आरोपीची ओळख पटवली. इकडे आग लावल्यानंतर विनोद सावळेने आपला भ्रमणध्वनी बंद केला आणि कुटुंबासह तो आधी राजस्थानच्या खाटू श्याम मंदिरात व नंतर अयोध्येला पळून गेला. जवळचे पैसे संपल्यानंतर १२ दिवसांनी तो जेव्हा पुन्हा सुरतमध्ये परतला, तेव्हा दिंडोली परिसरात पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

ही घटना वाचताना अंगावर काटा येतो, पण त्याहूनही अधिक गंभीर आहेत ते या राखेतून उभे राहणारे जळजळीत प्रश्न. सर्वात पहिला मुद्दा आहे तो रागाचा आणि सूडाच्या भावनेचा. असा राग काय कामाचा, जो स्वतःसोबत इतरांचेही आयुष्य उद्ध्वस्त करेल? आपला पगार मिळाला नाही, या रागाच्या भरात त्या कर्मचाऱ्याने जे पाऊल उचलले, ते कोणत्याही कोनातून समर्थनीय असू शकत नाही. रागाची ठिणगी स्वतःला जाळते, पण सूडाचा वणवा आजूबाजूच्या सर्वांनाच भस्मसात करतो. हक्क मागण्यासाठी जेव्हा माणूस हिंसेचा आणि विनाशाचा मार्ग पत्करतो, तेव्हा तो स्वतःचे 'पीडित' असण्याचे नैतिक मूल्य त्याच क्षणी गमावून बसतो. या विध्वंसामुळे विनोदला त्याचे १० हजार रुपये तर मिळाले नाहीतच, उलट आता तो गंभीर गुन्ह्यात अडकला असून त्याचे संपूर्ण आयुष्य तुरुंगाच्या गजाआड खितपत पडणार आहे. सूडाची भावना माणसाला किती आंधळे बनवते आणि तो स्वतःच्याच हाताने स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी कशी करतो, याचे हे जळजळीत उदाहरण आहे.

मात्र, या नाण्याला दुसरी आणि तितकीच काळी बाजू आहे, जिच्याकडे काणाडोळा करून चालणार नाही. या भीषण नुकसानीला केवळ तो माथेफिरू कर्मचारी जबाबदार आहे का? त्याच्या कष्टाचा मोबदला वेळेवर न देणारी व्यवस्था तितकीच गुन्हेगार नाही का? श्रमिकांचा घाम वाळण्यापूर्वी त्याला त्याची मजुरी मिळायला हवी, हा साधा मानवी नियम आहे. पण अनेकदा सत्तेच्या आणि संपत्तीच्या गुर्मीत कामगारांच्या मेहनतीला कवडीचीही किंमत दिली जात नाही. मालकाने जर त्या कामगाराच्या घामाची आणि कष्टाची योग्य वेळी दखल घेतली असती, त्याचा हक्काचा पगार वेळेत दिला असता आणि त्याला सन्मानाची वागणूक दिली असती, तर कदाचित हा प्रसंग उद्भवलाच नसता. कामगारांचे आर्थिक शोषण करणारी प्रवृत्ती कधीकधी स्वतःवरच कशी उलटते, हे या घटनेने दाखवून दिले आहे. पोटाच्या भुकेतून आणि अपमानातून निर्माण झालेल्या असंतोषाचा स्फोट किती भयानक असू शकतो, याचा हा धडा आहे.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात वेदनादायी भाग म्हणजे यात हकनाक भरडले गेलेले इतर निष्पाप व्यापारी. ज्यांचा या १० हजारांच्या वादाशी, त्या मालकाशी किंवा त्या संतापलेल्या कर्मचाऱ्याशी काडीमात्र संबंध नव्हता, अशा १६ व्यापाऱ्यांची दुकाने जळून खाक झाली. त्यांनी वर्षानुवर्षे रक्ताचे पाणी करून, १-१ रुपया जोडून उभा केलेला व्यवसाय एका रात्रीत डोळ्यांसमोर मातीत मिळाला. एका मालकाचा अहंकार आणि एका कर्मचाऱ्याचा बेबंद संताप, या दोन टोकांच्या संघर्षात या निष्पाप व्यापाऱ्यांच्या आयुष्याची कमाई राख झाली. त्यांच्या २४ कोटींच्या नुकसानीची भरपाई आता कोण देणार, हा प्रश्न निरुत्तरच राहतो. जोपर्यंत श्रमिकांच्या घामाचा योग्य सन्मान होत नाही आणि अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी हिंसेचा मार्ग निवडला जातो, तोपर्यंत अशा असंतोषाच्या आगीत निष्पाप लोकांचे संसार असेच राख होत राहतील. हा केवळ एका बाजाराला लागलेला वणवा नाही, तर समाजव्यवस्थेतील वाढत्या विषमतेचा आणि असंवेदनशीलतेचा हा धगधगता अंगार आहे.

- ९५६१५९४३०६

# आशियाई क्रिडा स्पर्धेत टिम इंडिया फेरीत तर विंडीज विरुद्ध मालिकेत आघाडी

**डॉ. दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारतीय क्रिकेट संघाने प्रत्यक्ष मैदानात न उतरताही आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. सोमवारी भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीचा सामना पावसामुळे रद्द झाला. सततच्या पावसामुळे नाणेफेकही होऊ शकली नाही. अखेरीस पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. आयसीसी टी-२० क्रमवारीत अफगाणिस्तानपेक्षा वरचे स्थान असल्यामुळे भारताने उपांत्य फेरीत थेट प्रवेश मिळवला आहे. आयसीसी टी-२० सांघिक क्रमवारीत अफगाणिस्तान १० व्या स्थानावर आहे, तर भारत अव्वल स्थानी आहे. भारत आता आपला उपांत्य फेरीचा सामना १ ऑक्टोबर रोजी खेळेल.

### पाकिस्तानचाही एकही सामना न खेळता उपांत्य फेरीत प्रवेश

पाकिस्तान क्रिकेट संघाने मैदानात न उतरताही आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. सोमवारी पाकिस्तान आणि हाँगकाँग चायना यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीचा सामना सततच्या पावसामुळे रद्द करण्यात आला. नाणेफेकही होऊ शकली नाही. सततच्या पावसामुळे आणि ओल्या मैदानामुळे पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. या परिस्थितीत, पाकिस्तानला त्यांच्या श्रेष्ठ आयसीसी टी२० संघ क्रमवारीचा फायदा झाला आणि त्यांना उपांत्य फेरीत थेट प्रवेश मिळाला. पाकिस्तान सध्या आयसीसी टी२० क्रमवारीत सहाव्या स्थानावर आहे, तर हाँगकाँग आणि चीन २४ व्या स्थानावर आहेत. या क्रमवारीतील फरकामुळे, उपांत्यपूर्व फेरीचा सामना रद्द होऊनही पाकिस्तानने उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. आता पाकिस्तान १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्याची वाट पाहत आहे, जिथे संघ आशियाई खेळांमधील आपली मोहीम पुढे नेण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल.

### भारताला उपांत्यपूर्व फेरीतही थेट प्रवेश मिळाला होता

भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश यांनी त्यांच्या उच्च क्रमवारीमुळे २०२६ च्या आशियाई खेळांच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. दरम्यान, अफगाणिस्तानने एक सामना जिंकून आणि एक गमावून 'अ' गटात दुसरे स्थान मिळवले. अफगाणिस्तानने 'अ' गटातील सामन्यात जपानला ४८ धावांनी हरवले, पण त्यानंतर नेपाळकडून ५ गडी राखून त्यांचा पराभव झाला.

### भारताने वेस्ट इंडिजला ८ गडी राखून पराभूत केले

भारत विरुद्ध वेस्ट इंडिजः विराट कोहली आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या शानदार शतकांच्या जोरावर भारताने पहिल्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजला ८ गडी राखून पराभूत केले. तिरुवनंतपुरम येथील ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने ४१.४ षटकांत २ गडी गमावून २९६ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

### वेस्ट इंडिजने २९५ धावा केल्या

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर वेस्ट इंडिजने शानदार सुरुवात केली. जॉन कॅम्पबेल आणि जस्टिन ग्रीव्हज यांनी १९.२ षटकांत पहिल्या विकेटसाठी १३५ धावा जोडल्या. कॅम्पबेलने ६० चेंडूंमध्ये ६ चौकार आणि ३ षटकारांसह ६२ धावा केल्या. कॅम्पबेल बाद झाल्यानंतर, ग्रीव्ह्सने कीसी कार्टीसोबत दुसऱ्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी केली. कार्टी १३ धावांवर बाद झाला. त्यानंतर वेस्ट इंडिजचा डाव अडखळला आणि १९८ धावांवर त्यांचा निम्मा संघ बाद झाला. मात्र, जस्टिन ग्रीव्ह्सने एक बाजू सांभाळत १०८ चेंडूंमध्ये १२ चौकारांसह १०१ धावा केल्या. त्यानंतर आमिर जांगूने ४३ चेंडूंमध्ये नाबाद ५८ धावा केल्या आणि रॉस्टन चेसने २४ धावा करून संघाला ५० षटकांत ७ गडी गमावून २९५ धावांपर्यंत पोहोचवले. कुलदीप यादव भारतासाठी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने ४ बळी घेतले. प्रसिद्ध कृष्णाने २ बळी आणि नितीश रेड्डीने १ बळी घेतला.

### गिलने रोहितसोबत चांगली सुरुवात करून दिली

२९६ धावांचे लक्ष्य गाठताना, कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांनी भारताला चांगली सुरुवात करून दिली. या जोडीने १२ षटकांत पहिल्या विकेटसाठी ७४ धावा जोडल्या. रोहित शर्मा ३५ चेंडूंमध्ये ३२ धावा करून बाद झाला. त्याच्या खेळीत २ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. त्यानंतर विराट कोहली क्रीजवर आला आणि त्याने गिलसोबत मिळून डाव सावरला.

### गिल आणि कोहलीने सामन्याचे चित्र पालटले

शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी दुसऱ्या विकेटसाठी शानदार भागीदारी केली. त्यांनी १३२ चेंडूंमध्ये १५१ धावा जोडून भारताला २२५ धावांपर्यंत पोहोचवले. गिलने कर्णधाराला साजेशी खेळी करत १०८ चेंडूंमध्ये ११० धावा केल्या, ज्यात १३ चौकार आणि १ षटकार होता. गिल बाद झाल्यानंतरही कोहलीने आपली आक्रमक फलंदाजी सुरू ठेवली.

### कोहलीने षटकार मारून आपले शतक पूर्ण केले

विराट कोहलीने शानदार फलंदाजी करत षटकार मारून आपले शतक पूर्ण केले. त्याने ८८ चेंडूंमध्ये नाबाद १३९ धावा केल्या. त्याच्या खेळीत १० चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता. कर्णधार गिल बाद झाल्यानंतर कोहलीने ऋतुराज गायकवाडसोबत मिळून भारताला लक्ष्यापर्यंत पोहोचवले. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४६ चेंडूंमध्ये नाबाद ७५ धावांची भागीदारी केली. ऋतुराज गायकवाड १९ चेंडूंमध्ये १३ धावांवर नाबाद राहिला. वेस्ट इंडिजकडून अल्झारी जोसेफ आणि रॉस्टन चेस यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. भारताने ४१.४ षटकांत २ गडी गमावून २९६ धावा करत सामना जिंकला. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात विराट कोहलीने ५९ धावा करताच एकदिवसीय कारकिदीर्तील १५,००० धावा पूर्ण केल्या. त्यानंतर त्याने सात चौकार आणि एका षटकारासह अवघ्या ७४ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले. यामुळे त्याच्या एकदिवसीय शतकांची एकूण संख्या ५५ झाली. सर्व आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधील त्याच्या शतकांची एकूण संख्या आता ८५ झाली आहे. एकदिवसीय शतकांच्या यादीत तो अव्वल स्थानी आहे, तर सर्व फॉरमॅटमधील शतकांच्या बाबतीत तो सचिन तेंडुलकरनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

### गिलचाही पराक्रम

भारतीय युवा कर्णधार शुभमन गिलने या सामन्यात शतक झळकावत आपले १० वे एकदिवसीय शतक पूर्ण केले, तसेच या बाबतीत त्याने भारताचा माजी कर्णधार एम. एस. धोनीला मागे टाकले.शुभमन गिलने आपल्या शेवटच्या नऊ डावांमध्ये तीन शतके आणि पाच अर्धशतके झळकावली आहेत.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय युवा कर्णधार शुभमन गिलने १०८ चेंडूंचा सामना करत १३ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ११० धावा केल्या होत्या. गिल २०२४ पासून एकदिवसीय क्रिकेटमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. या काळात त्याने नऊ डावांमध्ये तीन शतके आणि पाच अर्धशतके झळकावली आहेत. या नऊ डावांमध्ये तो केवळ एकदाच २३ धावांवर बाद झाला. या कालावधीतील त्याची सर्वोत्तम धावसंख्या १५४ आहे. एकाच वेळ दोन संघ वेगवेगळ्या दौऱ्यावर पाठविणारा भारत पहिला संघ ठरला असून दोन्ही ठिकाणी संघाची कामगिरी उत्तम होत असून तीन ऑक्टोबरला भारत जर आशिया चषकाच्या फायनल मध्ये खेळला तर वेगवेगळ्या प्रारूपात दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन भिन्न संघासह खेळण्याचा महापराक्रम भारताच्या नावे नोंदला जाईल.

- ९०९६३७२०८२

# औषधविक्रेता दिन : फार्मासिस्टच्या कामाचे कौतुक

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

वर्ल्ड फार्मासिस्ट डे दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश फार्मासिस्टच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणीव करुन देणे आणि औषधांच्या सुरक्षित वापरासाठी त्यांच्या योगदानाची प्रशंसा करणे हा आहे. फार्मासिस्ट हे आरोग्य सेवेत महत्त्वाची कडी आहेत. ते औषधे योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारे रुग्णांना उपलब्ध करून देतात. औषधांचे दुष्परिणाम, डोस आणि वापर याबाबत ते रुग्णांना सल्ला देतात. याशिवाय, आरोग्य व्यवस्थापनात औषधांचे परीक्षण, वितरण आणि रुग्णांच्या आरोग्याचे निरीक्षण करण्याचे काम ते करतात. वर्ल्ड फार्मासिस्ट डे ही जागतिक फार्मास्युटिकल फेडरेशनने २००९ मध्ये सुरू केली होती. यावर्षीचा मुख्य विषय फार्मासिस्ट्स स्ट्रेंथनिंग हेल्थ सिस्टिम्स आहे, ज्यामध्ये फार्मासिस्टांच्या कौशल्यांचा, ज्ञानाचा आणि अचूकतेचा महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट म्हणजे फार्मासिस्टच्या कामाचे कौतुक आणि त्यांच्याद्वारे समाजाला दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवेचे महत्त्व दाखवणे. औषधविक्रेता म्हणजे अशी व्यक्ती ज्यांच्याकडे औषधांची निर्मिती, साठवणूक, वितरण आणि विक्री करण्याचे अधिकृत ज्ञान आणि परवाना असतो. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांइतकेच औषध विक्रेत्यांचे स्थानही अत्यंत महत्त्वाचे असते, कारण ते डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतात.

**औषधविक्रेत्याची मुख्य कामे आणि जबाबदाऱ्याः** औषधांचे वितरणः डॉक्टरांनी लिहून दिलेल्या चिठ्ठीनुसार रुग्णांना अचूक औषधे देणे, रुग्णांना मार्गदर्शनः औषध कधी घ्यावे, कसे घ्यावे (उदा. जेवणापूर्वी की जेवणानंतर), त्याचे संभाव्य दुष्परिणाम काय असू शकतात, याबद्दल रुग्णाला समजावून सांगणे, औषधांची साठवणूकः औषधे खराब होऊ नयेत म्हणून ती योग्य तापमानात (उदा. फ्रीजमध्ये किंवा थंड ठिकाणी) सुरक्षित ठेवणे,

कालबाह्य औषधांची तपासणीः दुकानातील किंवा रुग्णालयातील औषधांची एक्सपायरी डेट तपासून ती बाजूला करणे.

औषधविक्रेता (फार्मासिस्ट) कसे बनावे? भारतात औषधविक्रेता किंवा फार्मासिस्ट होण्यासाठी विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर खालील व्यावसायिक कोर्सेस करावे लागतातः (डिप्लोमा इन फार्मसी)ः हा दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम आहे. स्वतःचे मेडिकल स्टोअर सुरू करण्यासाठी हा सर्वात लोकप्रिय पर्याय आहे.

(बॅचलर ऑफ फार्मसी)ः हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. याद्वारे औषध निर्मिती कंपन्यांमध्ये मोठ्या संधी मिळतात. (मास्टर ऑफ फार्मसी)ः बी.फार्म नंतर संशोधनासाठी केला जाणारा हा दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. कोर्स पूर्ण झाल्यानंतर "महाराष्ट्र राज्य औषधनिर्माण परिषद" कडे नोंदणी करून परवाना मिळवावा लागतो.

स्वतःचे औषधाचे दुकान सुरू करण्यासाठी पात्रता - जर तुम्हाला स्वतःचे मेडिकल सुरू करायचे असेल, तर खालील गोष्टी आवश्यक आहेतः अर्जदार स्वतः नोंदणीकृत फार्मासिस्ट असावा किंवा त्याने त्याच्या दुकानात पूर्णवेळ फार्मासिस्ट नियुक्त केलेला असावा. अन्न व औषध प्रशासनकडून मिळणारा ड्रग लायसन्स, दुकानाचा निश्चित नकाशा/जागा आणि औषध साठवणुकीसाठी रेफ्रिजरेटर (फ्रीज) करिअरच्या संधी- औषध निर्माण क्षेत्रात करिअरच्या अनेक उत्तम संधी उपलब्ध आहेत. स्वतःचे मेडिकल स्टोअर सुरू करणे किंवा दुसऱ्या मेडिकलमध्ये फार्मासिस्ट म्हणून काम करणेः सरकारी किंवा खाजगी रुग्णालयांमधील फार्मसीमध्ये काम करणे.

- ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# महाराष्ट्र राज्य अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन संपन्न

## किशोर वानखेडे यांची राज्य अध्यक्षपदी, तर माजी आमदार टेकचंद सावरकर यांची कार्याध्यक्षपदी एकमताने निवड, संस्थाचालक व आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी शासन सकारात्मकः महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन चिटणीस सेंटर, नागपूर येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनात किशोर वानखेडे यांची संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी, माजी आमदार टेकचंद सावरकर यांची कार्याध्यक्षपदी, तर नारायण श्रीमलवार यांची सरचिटणीस म्हणून एकमताने निवड करण्यात आली.



संस्थाचालकांना मार्गदर्शन करताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अनुदानित आश्रमशाळा ही देशातील उत्कृष्ट व्यवस्था ठरली आहे. आदिवासी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आधुनिक काळात त्यांचे शैक्षणिक आणि सामाजिक जीवनमान उंचावणे गरजेचे आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दर्जेदार शिक्षण, पौष्टिक भोजन, उत्तम आरोग्य यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता व डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी संघटनेने पुढाकार घ्यावा."

अनुदानित आश्रमशाळांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळणार नाही यासाठी शासन कटिबद्ध असून, संस्थाचालकांच्या मागण्या या विद्यार्थ्यांच्या हिताच्याच आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, संस्थाचालक, आयुक्त व सचिव (आदिवासी विकास) यांची एक संयुक्त समन्वय समिती गठीत करण्याचा विचार असून, आश्रमशाळांचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी दरमहा बैठक घेण्यात येईल, असा विश्वासही बावनकुळे यांनी दिला.

अधिवेशनाच्या सुरुवातीला संघटनेचे माजी अध्यक्ष भगवानराव देशमुख यांनी संघटनेचे महत्त्व व संस्थाचालकांचे योगदान यावर विचार मांडले. किशोर वानखेडे यांनी संघटनेच्या मागील ७ वर्षांच्या कामाचा आढावा सादर केला. माजी आमदार टेकचंद सावरकर यांनी आश्रमशाळांसमोरील विविध अडचणी मांडल्या. यामध्ये प्रामुख्याने संस्थाचालकांवर विनाचौकशी थेट फौजदारी कारवाई होऊ नये. 'पवित्र पोर्टल'द्वारे उमेदवार उपलब्ध न झाल्यास संस्थास्तरावर शिक्षक भरतीस परवानगी मिळावी. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे बाह्यस्त्रोताऐवजी पूर्ण वेतनावर भरली जावीत. विद्यार्थी प्रवेशासाठी असलेली ८० कि.मी. अंतराची अट रद्द करावी. सहायक अधीक्षक व अधीक्षिका पदांची निर्मिती, कनिष्ठ महाविद्यालयांना स्वयंपाकी पदे मंजूर करणे आणि सफाई कामगारांची पदे वाढवणे. विजाभज आश्रमशाळांप्रमाणेच आदिवासी आश्रमशाळांना सर्व आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवणे. आकस्मिक अनुदानात वाढ करून निवासी विद्यार्थ्यांसाठी प्रतिमहा १००० रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांसाठी ५०० रुपये अनुदान देणे. मावळते अध्यक्ष राजेंद्र सरोदे यांनी संघटनेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनाला नवापूरचे आमदार शिरीष नाईक, विधान परिषद सदस्य दादाराव केचे, माजी खासदार अनंत गुढे, माजी आमदार शिवराम झोडे, विजयराज शिंदे, उत्तमराव इंगळे, मुनगीरवार यांच्यासह चामेश्वर गहाणे, राजेश मून, दत्ता भुतेकर, युवराज पाटील, शशिकांत वाणी, पोपटराव सोनवणे, दिलीप पटेकर, प्रशांत देवरे, मृणाल जोशी व राज्यातील सुमारे ५०० संस्थाचालक व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिवेशनानंतर संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डोरली गावात बिबट्याचा धुमाकूळ, बकरीची शिकार, ग्रामस्थांमध्ये भीती



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील डोरली गावात बिबट्याचा वावर पुन्हा एकदा दिसून आला. सोमवारी २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:३० वाजताच्या सुमारास गावातील रहिवासी गोविंदा इंगोले यांच्या घराजवळ बिबट्याने बकरीची शिकार केली. या घटनेमुळे गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रणजित गजभिये यांच्या शेतालगत गोविंदा इंगोले यांच्या बकऱ्या बांधलेल्या होत्या. सोमवारी सायंकाळी शेताच्या दिशेने आलेल्या बिबट्याने बांधलेल्या बकरीच्या मानेला पकडून तिची शिकार केली. या हल्ल्यात बकरीचा जागीच मृत्यू झाला.

बकरीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून पत्नी द्रौपदाबाई इंगोले यांनी घराबाहेर येऊन पाहिले असता बिबट्या बकरीला ओढून नेत असल्याचे दिसले. महिलेने आरडाओरड केल्याने बिबट्याने बकरी तिथेच सोडून शेताच्या दिशेने पळ काढला.

महिलेचा आवाज ऐकून ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील रीना चंद्रकांत मस्के, सरपंच, तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. वनविभागाचे वनरक्षक सतीश इंगोले, मयूर बलकी आणि मयंक निकसे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. घटनास्थळी बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले आहेत. गावाच्या बस्तीशेजारीच घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंता आहे. डोरली परिसरात बिबट्याचे सातत्याने दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झालेली आहे. वन विभागाने तातडीने परिसरात गस्त घालून आवश्यक उपाययोजना करावी, अशी ग्रामस्थांची मागणी केली आहे.

## बंदराचा पाठलाग बिबट्याच्या जीवावर बेतला : विजेच्या धक्क्याने बिबट्या व बंदराचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे) :** बंदराचा पाठलाग करताना विद्युत डीपीवर चढलेल्या मादी बिबट्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना चिमूर वनपरिक्षेत्रातील शंकरपूर उपवनक्षेत्राच्या वगाडपेठ परिसरात सोमवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेत बिबट्याचा पाठलाग करणाऱ्या बंदराचाही मृत्यू झाला. पिंपळगाव येथील शेतकरी महादेव धारणे यांच्या शेतात विद्युत डीपी आहे. रविवारी सायंकाळच्या सुमारास या डीपीवर बंदर असल्याचे दिसून आले. त्याच्या पाठलाग करत मादी बिबट्या डीपीवर चढली असावी. यावेळी विद्युत प्रवाहाचा धक्का लागून बिबट्या आणि बंदराचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे.



सोमवारी सकाळी महादेव धारणे शेतात गेले असता त्यांना डीपीजवळ बिबट्या आणि बंदर मृतावस्थेत आढळले. त्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर देऊळकर, मानद वन्यजीव रक्षक आमोद गौरकर, वनपाल राजेंद्र मेश्राम, वनरक्षक कालिदास गायकवाड आणि वनमजूर घटनास्थळी दाखल झाले.वनविभागाच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृत प्राण्यांना खडसंगी येथील वनविभागाच्या कार्यालयात आणले. त्यानंतर ब्रह्मपुरीचे उपवनसंरक्षक डॉ. कुमार स्वामी, सहायक उपवनसंरक्षक महेश गायकवाड, मानद वन्यजीव रक्षक आमोद गौरकर, पशुवैद्यकीय सहाय्यक आयुक्त डॉ. रमेशकुमार ओव्हाळ, शंकरपूर येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज पाटील, चैतन्य सोनुले, वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर देऊळकर, वनपाल राजेंद्र मेश्राम आणि वनरक्षक कालिदास गायकवाड यांच्या उपस्थितीत दोन्ही प्राण्यांचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर नियमानुसार त्यांचे दहन करण्यात आले.

## काटोल येथे नागपूर कराराची होळी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

विदर्भ राज्य आंदोलन समिती व शेतकरी संघर्ष कृती समिती काटोल यांच्या संयुक्त विद्दमाने फसव्या" नागपूर कराराची होळी "डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ काटोल येथे करण्यात आली. नागपूर करार म्हणजे भारतातील सर्व राज्याची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावाचा अहवाल तयार करण्यासासाठी एक उच्च अधिकार आयोग नेमण्यात आला होता त्यात स्वतत्र राज्याची निर्मिती तयार करण्याकरिता निर्णय घेण्यात आले १९५३ चा करार हा विदर्भाच्या हक्काचा प्रश्न आहे



पण आज तो केवळ इतिहासातील एक कागदाचा तुकडा बनला या फसव्या नागपूर कराराचा जनतेला कुठलाही फायदा झाला नाही.

या नागपूर कराराची होळी करतेवेळी उपस्थितात समाजसेवक सुभाषजी नोरोलीये माजी सभापती संजयजी डांगोरे व दिगांबर डोंगरे, समितीचे अध्यक्ष बाबाराव वाघमारे, विलास पोहकर, पुष्पा सावरकर, प्रा. वीरेंद्र इंगळे, रामराव पाटील, प्रा. रवी दलाल, भूषण मुसळे, यमुना पेरोडिया, करुणा येवले, श्रीकांत गौरखेडे, दीपकर गायकवाड, दिलीपजी घारड, ज्योती राऊत, राहुल नागपुरे, योगेश फाले, छत्रपती दुपारे, मीना बालपांडे आज शेतकरी, बेरोजगारी सिंचन, उद्योग या सर्व प्रश्नांवर जनतेला संघर्ष करावा लागत आहे.

१९५३ च्या फसव्या नागपूर कराराने विदर्भाच्या जनतेचा विश्वासघात केला. व विदर्भाच्या वाट्याला आले अपुरा सिंचन आणि औद्योगिक मागासलेपणा, अनुशेष, कुपोषन, विदर्भाला हे नको न्याय हवा, अधिकार हवा, आम्हाला फसवा नागपूर करार नको,स्वतत्र विदर्भ राज्य हवे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छोट्या राज्याची संकल्पना आम्हाला हवी आहे. यावेळी फसव्या नागपूर कराराची होळी करण्याकरिता यावेळी शेकडो शेतकरी व विदर्भवादी उपस्थिती होते.

## वर्धा येथे पेन्शनर्स असोसिएशनची भव्य सभा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

सेवानिवृत्त केंद्र तथा राज्य कर्मचारी शासकीय व अशासकीय लोकल बॉडीज सेवानिवृत्त वेल्फेअर संघटना वर्धाच्यावतीने आमसभा वर्धा येथील श्री सती अनुसया मंगल कार्यालय नागपूर रोड वर्धा येथे संपन्न झाली. या भव्य सभेला १,००० पेक्षा जास्त निवृत्तीवेतनधारक (पेन्शनर्स) उपस्थित होते, ही बाब पेन्शनधारकांमधील मोठी एकजूट आणि त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबतची संवेदनशीलता दर्शवते.




सभेच्छा अध्यक्षस्थानी पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष माजी प्राचार्य अरविंद गवरशेट्टीवार, तर प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे शिक्षणमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, माजी शिक्षक आमदार विश्वनाथ डायगव्हाणे, वर्धा नगरपरिषदचे महापौर सुधीर पांगुळ तसेच विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप भाऊ दाते काटोल पेन्शनर्स संघटनेचे अध्यक्ष रमेश पोतदार, श्री छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार प्राप्त रामरावजी किटे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव शेषराव बिजवार यांनी केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून शेषराव बिजवार यांनी सभेत सेवानिवृत्त कर्मचारी आणि पेन्शनर्स यांच्या प्रलंबित मागण्यांवर सविस्तरपणे मांडल्या.

त्यात काल्पनिक वेतन वाढ, कम्युटेशनचा (मासिक पेन्शन कपात) कालावधी १५ ऐवजी १२ वर्षे करण्याची, आरोग्य विमा पेन्शन मध्ये जमा करण्याची ,पेन्शन नियमित व सुलभ पद्धतीने मिळावे अशी मागणी केली. शिक्षक आमदार श्री सुधाकर अडबाले यांनी आपल्या भाषणातून जुनी पेन्शन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या नियुक्तीचा आदेश शालेय शिक्षण विभागाने काढल्याबद्दल शिक्षण मंत्री डॉ पंकज भोयर यांचे विशेष आभार मानले, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा मार्ग ऑनलाईन पद्धतीने अधिक सुलभ करावा अशी देखील मागणी त्यांनी यादरम्यान केली. राज्याचे शिक्षण मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शिक्षकांच्या वरील मागण्यांचा शासन विचार करत असल्याचे स्पष्ट केले सध्या आचारसंहिता असल्यामुळे ते यावर फारसे भाष्य करू शकले नाही.

वर्धा नगर परिषदेचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी सेवानिवृत्तांना देशाचा आधारवड म्हणत सेवानिवृत्त व जेष्ठ पेन्शनर्सच्या आरोग्याची दखल घेतली त्यांनी आपल्या भाषणातून वर्धेत स्वच्छता अभियान राबवत असल्याचे देखील सुचित केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद गवरशेट्टीवर यांनी असोसिएशन द्वारा राबविण्यात येत असलेल्या विधायक कार्याचा आढावा घेत पेन्शनर्स कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांचा व पेन्शन प्रक्रिया सुलभ करण्याचे आवाहन केले.

सदर आमसभेत जमाखर्चाचा हिशोब व अंदाजपत्रक योगेश्वर भोमले यांनी मांडले जमाखर्चाच्या या हिशोबाला व अंदाजपत्रकाला सर्वांमध्ये मंजूर मिळाली. या प्रसंगी ७५ वर्ष गाठणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला याशिवाय इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव श्री शेषराव बिजवार यांनी तर आभार प्रदर्शन रंजना दाते यांनी केले.

### थोडक्यात

## ऊत्कर्ष काळे याची भिलाई(छत्तीसगड) येथे होणाऱ्या ४५ व्या सब ज्युनियर नॅशनल बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**



ऑरचीड पब्लिक स्कूल काटोल. येथील वर्ग दहावीचा विद्यार्थी ऊत्कर्ष साहेबराव काळे.याची दिनांक ३ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान भिलाई(छत्तीसगड) येथे होणाऱ्या ४५ व्या सब ज्युनियर नॅशनल बॉल बॅडमिंटन स्पर्धा २०२६ करीता महाराष्ट्र संघात नागपूर ग्रामीण (काटोल)संघा कडुन निवड झालेली आहे. तो उत्कृष्ट खेळाडू असून त्याने आपल्या यशाचे श्रेय आई बाबा, प्राचार्य, व मार्गदर्शक परेश देशमुख सर,प्रशिक्षक अक्षय सावरकर यांना दिलेले आहे.

## शैक्षणिक मार्गदर्शन शिबिरात ६० विद्यार्थ्यांचा सहभाग

### गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आदिवासी हलबा समाज विकास संस्थेच्यावतीने शनिवारी, २६ सप्टेंबर रोजी संत कबीर हायस्कूल, नाईक तलाव, बांग्लादेश, नागपूर येथे शैक्षणिक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. मनोहरराव वाकोडीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात इयत्ता ८ वी ते १० वीच्या सुमारे ६० विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. शिबिराचे उद्घाटन चंद्रकलाताई बारापत्रे, संचालिका गणपती फाऊंडेशन, साहित्यिक -कवयित्री- लेखिका मंजूषा हेडाऊ, आरती गोखले व संत कबीर हायस्कूलचे सचिव जयप्रकाश हेडाऊ यांच्या हस्ते झाले. संस्थेचे सचिव भास्कर चिचघरे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन नरेशजी नखाते, विज्ञान विषयाचे मार्गदर्शन मनोज पाखोंडे, तर गणित विषयाचे मार्गदर्शन विनोद आर. निनावे यांनी केले. तसेच बाल लैंगिक शोषणापासून संरक्षण, मुलींची सुरक्षितता, महिला सक्षमीकरण आणि समाजप्रबोधन या विषयांवर पंचपावली पोलीस ठाण्याच्या दामिणी पथकातील PSI पूनम खिल्लारे व शुभांगी बारेकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती सोबतच सामाजिक जाणीव निर्माण करणारे मार्गदर्शन मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. सौ. मंजूषा हेडाऊ यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच समाजासाठी योगदान देण्याची भावना विकसित करावी, असे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक करून भविष्यात आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे संचालन संतोष भंडारवार यांनी, तर आभार रविंद्र फनिभरे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वितेसाठी संस्थेचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## लाल बावटा वाहतूक कामगार युनियनतर्फे शहीद भगतसिंग यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लाल बावटा वाहतूक कामगार युनियन महाराष्ट्राच्या वतीने महान क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसैनिक शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमात युनियनचे पदाधिकारी, वाहतूक कामगार तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांनी शहीद भगतसिंग यांच्या धाडसी विचारांचे आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण केले. भगतसिंग यांनी तरुणाईमध्ये स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाची भावना निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या क्रांतिकारी विचारांमधून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

यावेळी भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. शहीद भगतसिंग अमर राहो, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कामगारांच्या हक्कांसाठी तसेच सामाजिक न्याय आणि समतेसाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. लाल बावटा वाहतूक कामगार युनियन महाराष्ट्राच्या वतीने आयोजित या अभिवादन कार्यक्रमातून शहीद भगतसिंग यांच्या त्यागाची आणि क्रांतिकारी विचारांची आठवण नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश गुरुप्रीत सिंग यांनी यावेळी दिला. याप्रसंगी अनिश सिरकिया, चंदू पानतावणे, सचिन मुडे आणि पुष्पा सोनबावणे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## पालक सभेत विद्यार्थ्यांचा गौरव, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

जि. प. प्राथमिक शाळा गुमगाव क्रमांक १ येथे पालक सभा उत्साहात पार पडली. यावेळी शिष्यवृत्ती, मंथन व नवोदय प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच तयारीसाठी मार्गदर्शनपर पुस्तकांचे वितरण करण्यात आले. बीआयजीच्या माध्यमातून शाळेला सायन्स किट व क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. सत्र २०२५-२६ मध्ये विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मोनाली लोनबैले, सरपंच अरुण देवतळे, केंद्र समन्वयक भूपेश चव्हाण यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

थोडक्यात

## कुंभारीच्या प्रतीक वडेची कमाल! विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक, राज्यस्तरीय स्पर्धेत मारली धडक

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

स्थानिक ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर पुन्हा एकदा जिल्ह्याचे नाव उंचावले आहे.



भंडारा येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत मौदा तालुक्यातील कुंभारी येथील उदयोन्मुख पैलवान प्रतीक रामजी वडे याने १४ वर्षांखालील (अंडर-१४) ६२ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे त्याची आता राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी (सन २०२६-२७) निवड झाली असून, त्याने नागपूर जिल्ह्याचा मान वाढवला आहे.प्रतीक हा मौदा तालुक्यातील बाबदेव येथील श्रीराम विद्यालयाचा इयत्ता ८ वीचा विद्यार्थी आहे.

अत्यंत प्रतिकूल आणि ग्रामीण परिस्थितीतून पुढे येत त्याने हे यश मिळवले आहे. प्रतीकच्या या यशामागे त्याचे मार्गदर्शक वस्ताद सेवकभाऊ गडे आणि वस्ताद जितेंद्रभाऊ नारनवरे यांचे मोलाचे योगदान आहे. वस्तादांच्या कडक शिस्तीत आणि योग्य मार्गदर्शनाखाली प्रतीकने घेतलेल्या अतोनात मेहनतीचेच हे फळ असल्याचे बोलले जात आहे. छोट्याशा कुंभारी गावातून थेट राज्य पातळीपर्यंत झेप घेणाऱ्या प्रतीक वडेवर सध्या संपूर्ण नागपूर जिल्ह्यातून आणि मौदा तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. तो राज्यस्तरीय स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावून आपल्या गावाचे आणि जिल्ह्याचे नाव रोशन करेल, असा विश्वास समस्त कुंभारी ग्रामस्थ, वडे परिवार, मित्र मंडळी तसेच श्रीराम विद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आला असून त्याला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## बल्लारपुरात २९ सप्टेंबरला मोफत निदान व उपचार महाआरोग्य शिबिर




**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे)**

अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन रिसर्चद्वारा संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) आणि महिला व बाल कल्याण समिती, नगर परिषद बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी मोफत सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा गांधी विद्यालय, जुना बसस्थानक, बल्लारपूर येथे सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रुग्णांची नोंदणी करण्यात येणार आहे. या शिबिरात वैद्यकीय तज्ज्ञांकडून विविध आजारांची तपासणी करण्यात येणार असून रक्तदाब, रक्तातील साखर, किडनीचे आजार, हृदयरोग, अशक्तपणा, वारंवार चक्कर येणे तसेच दीर्घकाळ ताप येणे आदी आजारांवर मार्गदर्शन व उपचार केले जाणार आहेत. याशिवाय नेत्ररोग, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, कान-नाक-घसा आणि त्वचारोग तज्ज्ञांचीही सेवा उपलब्ध राहणार आहे.

मोतिबिंदू, तिरळेपणा, हर्निया, हायड्रोसिल, अंगावरील गाठी, मुतखडा, पोटाचे आजार, गलगंड व थायरॉईड, महिलांचे विविध आजार, बालकांमधील हृदयातील छिद्र, कुपोषण, संधिवात, फ्रॅक्चर, मणक्याचे आजार, त्वचेचे विकार आदींची तपासणी केली जाणार आहे. शिबिरात नोंदणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी मोफत राहणार आहे. उपचारासाठी रुग्णालयात भरती होणाऱ्या पात्र रुग्णांना आवश्यक सामान्य चाचण्या, एक्स-रे, लघवी तपासणी, सोनोग्राफी, खाट व भोजन मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक असलेल्या सीटी स्कॅन, एमआरआय यांसारख्या अतिविशिष्ट तपासण्या सवलतीच्या दरात करण्यात येणार आहेत. पात्र रुग्णांना आवश्यकतेनुसार विविध शस्त्रक्रिया व पुढील उपचार मोफत करण्यात येणार आहेत. यामध्ये गर्भाशयाच्या पिशवीच्या शस्त्रक्रिया, अंगावरील गाठी, थायरॉईड, हर्निया, हायड्रोसिल, कान-नाक-घसा, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, बालकांच्या हृदयातील छिद्रावरील उपचार, हाडांचे फ्रॅक्चर, मेंदू व हृदयाशी संबंधित शस्त्रक्रिया, इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी, कॅन्सरचे निदान व संदर्भ सेवा तसेच फाटलेले ओठ, दुभंगलेले टाळू आणि जन्मजात मुखविकृतीवरील शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे.

आयुष्मान भारत कार्ड योजनेअंतर्गत पात्र असलेल्या इतर उपचार व शस्त्रक्रियांचाही लाभ मिळणार आहे. स्तन व गर्भाशयाच्या कॅन्सरच्या तपासणीची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. शिबिरातून रुग्णालयात भरती होण्यासाठी सांगण्यात आलेल्या रुग्णांसाठी रुग्णालयात जाण्याची मोफत वाहन व्यवस्था करण्यात येणार आहे. संबंधित रुग्णांनी आधार कार्ड, राशन कार्ड, आयुष्मान भारत कार्ड तसेच राशन कार्डवर नाव असलेल्या सदस्यांचे आधार कार्ड यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात. रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या तपासण्या, औषधे किंवा आरोग्य सेवांचा खर्च संबंधित रुग्णांना स्वतः करावा लागणार असून शिबिरातील सवलतीचा कालावधी एक महिन्याचा राहणार आहे. बल्लारपूर शहरातील महिला, भगिनी तसेच सर्व नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा डॉ. अल्का वाढई, मुख्याधिकारी विशाल वाघ, सभापती मेघा भाले आणि उपसभापती शिल्पा चुटे यांनी केले आहे.

## सिंधुताई लोखंडे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

येथील श्रीमती सिंधुताई रामरावजी लोखंडे (वय ८० वर्षे) यांचे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या



पार्थिवाची अंत्ययात्रा मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता त्यांचे सुपुत्र गिरीश रामरावजी लोखंडे, प्लॉट नं. ३९-डी, साई कृष्णा अपार्टमेंट, नेल्को सोसायटी, सुभाषनगर, नागपूर येथील निवासस्थानाहून निघणार आहे. त्यांच्यावर सकाळी १० वाजता अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली व मोठा आप्तपरिवार आहे.

# राजुरात भाजप सरकारविरोधात काँग्रेसचा भव्य जनआक्रोश मोर्चा

### पाच हजार शेतकरी, महिला, युवक व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, विविध मागण्यांचे निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, राजुरा (धनंजय पांढरे)**

शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, विद्यार्थी, बेरोजगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्या वतीने सोमवारी राजुरा येथे भाजप सरकारविरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुभाष धोटे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चाला सुमारे पाच हजार नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हणमंत पवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



सकाळी ११ वाजता भवानी माता मंदिर येथून मोर्चाला सुरुवात झाली. हातात विविध मागण्यांचे फलक घेतलेल्या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करीत तहसील कार्यालयाकडे कूच केली. सरकारच्या धोरणांविरोधातील घोषणांनी राजुरातील परिसर दणाणून गेला. मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर उपविभागीय अधिकारी, राजुरा यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे राज्यपाल, राष्ट्रपती आणि जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर येथे भव्य जाहीर सभा घेण्यात आली.

काँग्रेसने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधताना राजुरा विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांना तातडीने पीक नुकसानभरपाई व कर्जमाफी द्यावी, संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करावा, शेतमालाला कायदेशीर हमीभाव मिळावा आणि खते-बियाण्यांचा काळाबाजार थांबवावा, अशी मागणी केली. जिवतीतील सातबारा व फार्मर आयडीचे प्रश्न सोडविण्यासह राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यातील शेतकऱ्यांना कायमस्वरूपी पट्टे देण्याची मागणीही करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा मिळावा, अशी मागणी करण्यात आली.

लाडकी बहीण योजनेचे पोर्टल पुन्हा सुरू करून वगळण्यात आलेल्या महिलांना न्याय द्यावा, नवीन नोंदणी सुरू करावी आणि महिलांवर NCMC कार्डची सक्ती करू नये, अशी मागणी करण्यात आली. निराधारांना नियमित आर्थिक मदत द्यावी, स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांवर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार थांबवावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

मतचोरीच्या आरोपांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, ग्रामीण व शहरी भागातील खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, घरकुल व सामाजिक सुरक्षा योजनांचे प्रलंबित लाभ द्यावेत, पेपरफुटीला आळा घालावा, स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आल्या. गॅस, पेट्रोल, डिझेल आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींपासून नागरिकांना दिलासा द्यावा तसेच ए-२० पेट्रोल बंद करावे, अशी मागणीही करण्यात आली.

OBC समाजाची जातनिहाय जनगणनेत स्वतंत्र नोंद करावी आणि OBC, SC व ST समाजासाठी असलेला निधी अन्य कामांसाठी खर्च करू नये, अशी मागणीही काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते हणमंत पवार म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिक विविध समस्यांनी त्रस्त आहेत.

शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, कर्जमाफी झालेली नाही, महागाई वाढत आहे, बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे आणि विविध शासकीय योजनांच्या लाभापासून नागरिक वंचित आहेत. राजुरातील जनआक्रोश मोर्चा हा जनतेच्या मागण्यांचा आवाज शासनापर्यंत पोहोचविणारा असून सरकारने या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे त्यांनी सांगितले.

माजी आमदार सुभाष धोटे यांनी शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई व सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी केली. जिवतीतील सातबारा व फार्मर आयडी, शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी पट्टे, अखंडित वीजपुरवठा, लाडकी बहीण योजनेतील महिलांचे प्रश्न, रस्ते, घरकुल आणि सामाजिक सुरक्षेचे प्रश्न तातडीने सोडविले पाहिजेत, असे ते म्हणाले.

पेपरफुटीला आळा घालण्यासह मतचोरीच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची मागणीही त्यांनी केली. शासनाने हजारोंच्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या मागण्यांची दखल घेऊन ठोस निर्णय न घेतल्यास जनतेच्या प्रश्नांसाठी काँग्रेसचा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राजुरा विधानसभा क्षेत्रातील नागरिकांनी विविध प्रश्नांसाठी मोठ्या संख्येने एकत्र येत जनआक्रोश व्यक्त केल्याचे सांगितले. पीक नुकसानभरपाई, कर्जमाफी, लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित प्रश्न, रोजगार, रस्ते, घरकुल आणि सामाजिक सुरक्षेचे प्रश्न तातडीने मार्गी लागले पाहिजेत. स्मार्ट मीटर व सोलर पंपाची सक्ती बंद झाली पाहिजे. जनतेच्या हक्कासाठी काँग्रेस सातत्याने आवाज उठवत राहील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राजुरा विधानसभा काँग्रेसचे समन्वयक तथा नगराध्यक्ष अरुण धोटे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजयराव बावणे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, महिला जिल्हाध्यक्ष कुंदा जेनेकर, विनोद दत्तात्रय, प्रमोद बोरीकर, दीपक वाढई, शहर अध्यक्ष हरजीत सिंग संधू, नगराध्यक्षा अलका वाढई, नगराध्यक्षा दीप्ती सोनटक्के, उपनगराध्यक्ष राजू रेड्डी, संजय मेंढी, देवेंद्र आर्या, सभापती अशोकराव बावणे, तिरुपती इंदूरवार, तालुकाध्यक्ष उत्तमराव पेचे, रंजन लांडे, डॉ. अंकुश गोतावळे, अशोक रेचनकर, गोविंदा उपरे, अब्दुल करीम, निर्मला कुळमेथे, सोनू दिवसे, आशा खासरे, विचार मंच जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सपना मोरे यांच्यासह राजुरा विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी, कामगार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे संचालन सचिन फुलझेले यांनी केले.

## तीन जीव घेतल्यानंतर टी-१२२ वाघाला जेरबंद करण्याचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे )**

सावली वनपरिक्षेत्रात मानव-वाघ संघर्षाच्या घटनांमध्ये तीन जणांचा मृत्यू आणि एक जण गंभीर जखमी झाल्यानंतर वनविभागाने नर वाघ टी-१२२ याला जेरबंद करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्राचे मुख्य वन्यजीव रक्षक एम. श्रीनिवास रेड्डी यांनी २४ सप्टेंबर रोजी आदेश जारी केला असून, तज्ज्ञ पथकाच्या मदतीने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.



१ ऑगस्टपासून सावली वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्याच्या चार गंभीर घटना घडल्या. १ ऑगस्ट रोजी सामदा येथील हिरामण साखरे यांचा बळी गेला. २६ ऑगस्ट रोजी केरोडा येथील नामदेव कुकुडकर यांच्यावर हल्ला होऊन ते गंभीर जखमी झाले. १६ सप्टेंबर रोजी निलसनी पेटगाव येथील वासुदेव वाकुडकर, तर २१ सप्टेंबर रोजी सामदा येथील हेमंत भुर्से यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. याशिवाय या परिसरात वाघाने २३ पशुधनांची शिकार केली आहे.

व्याहाड बु., सामदा, सोनापूर, निलसनी पेटगाव, कापसी, कढोली, सिरसी, साखरी, जिबगाव, पेटगाव, जांब बु., पेटगाव रै. केरोडा, हरंबा, उमरी, डोनाळा आणि उपरी या गावांमध्ये वाघाची दहशत निर्माण झाली आहे. शेतशिवार तसेच रस्त्यांच्या परिसरात टी-१२२ वाघाचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मानव-वाघ संघर्षाच्या घटनांचा आढावा घेण्यासाठी गठित समितीने संबंधित वाघाला कायमस्वरूपी पकडण्याची शिफारस केली होती. परिसरात वाघांची संख्या अधिक असून, भविष्यात आणखी मानव-वाघ संघर्ष होण्याची शक्यता असल्याचे समितीने नमूद केले आहे.

दरम्यान, वाघाला पकडण्यासाठी वनविभागाकडून पिंजरे लावण्यात आले असून, त्याच्या हालचालींवर कॅमेरा ट्रॅपद्वारे लक्ष ठेवले जात आहे. वनविभागाचे पथक परिसरात चोवीस तास गस्त घालत असून, नागरिकांमध्ये जनजागृतीही केली जात आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे यांनी सांगितले की, टी-१२२ वाघाला जेरबंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हा वाघ दोन वेळा पिंजऱ्याजवळ आला; मात्र पिंजऱ्यात न जाता पुन्हा जंगलात निघून गेला. त्यामुळे आता तज्ज्ञ पथकाच्या मदतीने भुलीचे इंजेक्शन देऊन वाघाला जेरबंद करण्याची तयारी सुरू आहे. हा वाघ वयस्कर असल्याचेही त्यांनी सांगितले.

वाघाला पकडताना त्याला कमीत कमी त्रास होईल, तसेच मानवी संपर्कामुळे त्याच्या नैसर्गिक वर्तनावर परिणाम होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जेरबंद केल्यानंतर वाघाची पशुवैद्यकीय तपासणी करण्यात येणार असून, त्याच्या आरोग्याचा आढावा घेतल्यानंतर योग्य नैसर्गिक अधिवासात स्थलांतर करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. टी-१२२ वाघाला पकडण्याचा आदेश ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहे.

## केळवदजवळ अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक, ६० वर्षीय व्यक्ती जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर :** केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील जीटीएन कंपनीसमोरील पेट्रोल पंपाजवळ दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास दुचाकीला अज्ञात वाहनाने मागून धडक दिल्याची घटना घडली. जखमी व्यक्तीचे नाव देवराव




मधुकर जोगी (वय ६०), रा. सावनेर असे आहे. ते मध्यप्रदेश येथून सावनेरकडे येत असताना अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. यामुळे ते रस्त्यावर पडून जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या हितज्योती आधार फाउंडेशनच्या मृत्युंजय टीमने तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमीला मदत केली. त्यांना सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर मेडिकल रुग्णालयात रवाना केले. देवराव जोगी हे रेमंड कंपनीत कामावर असल्याची माहिती आहे. अपघातानंतर अज्ञात वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. केळवद पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून अज्ञात वाहनाचा शोध घेत आहेत. सावनेर परिसरातील वाढते अपघात चिंतेचा विषय बनले असून, गेल्या एका आठवड्यात चार अपघातांत दोन जणांचा मृत्यू, एकाची प्रकृती चिंताजनक तर तिघे जण किरकोळ जखमी झाले आहेत.

# दुष्काळाच्या झळांनी शेतकरी होरपळला, मदतीसाठी नरखेड तहसीलसमोर मुंडन आंदोलन

**प्रति हेक्टरी एक लाखांची नुकसानभरपाई, प्रलंबित पीकविमा व कर्जमाफीसह दहा मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा आक्रमक पवित्रा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

अल्प पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, हरभरा यांसह विविध पिकांना फटका बसल्याने उत्पादन हातचे गेले असून वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने नरखेड तहसील कार्यालयासमोर मुंडन आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले.



क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष (नागपूर) सागर अ. दुधाने यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रेम नारायण वैद्य, भूषण राऊत, गजानन टेंभेकर आणि हर्षल जाने यांनीही मुंडन करून शासनाच्या शेतकरीविषयक धोरणांविरोधात निषेध नोंदविला. आंदोलनस्थळी शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना निवेदन देण्यात आले असून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली. दुष्काळामुळे पिकांचे झालेले नुकसान केवळ कागदोपत्री नोंदवून न ठेवता प्रत्यक्ष पंचनामे करून त्याआधारे मदत देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.

संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई देणे, नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे विशेष अनुदान देणे, सन २०२४ व २०२५ मधील प्रलंबित पीकविम्याची रक्कम तातडीने खात्यावर जमा करणे तसेच २०२६ चा पीकविमा नियमानुसार अदा करणे यांचा समावेश आहे.

कर्जाच्या थकबाकीमुळे शेतकऱ्यांचे सिबील खराब होऊ नये यासाठी शासनाने तातडीने आदेश काढावेत, पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही अडथळ्याविना नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे आणि सन २०१९ पूर्वीच्या प्रलंबित पीककर्जाबाबत पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय शेतमजूर व भूमिहीन कुटुंबांसाठी स्वतंत्र आर्थिक पॅकेज, पशुधनासाठी चारा छावण्या अथवा चाऱ्याची उपलब्धता, नागरिक व पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे आणि शेती औजारे, ठिबक व तुषार सिंचनावरील थकीत अनुदान तातडीने देण्याची मागणी करण्यात आली.

**ठोस निर्णय घ्या, अन्यथा आंदोलन तीव्र करू**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावा आणि मागण्यांची कालबद्ध अंमलबजावणी करावी. केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी भूमिका संघटनेने मांडली. शासनाकडून सकारात्मक निर्णय न झाल्यास शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलनाला माजी सभापती वसंत चांडक, नकुल लोहे, गुणेश्वर बंदे, प्रवीण लुंगे, प्रज्वल ठाकरे यांच्यासह परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

थोडक्यात

## गौरव नासरे यांना 'समाजरत्न पुरस्कार-२०२६' प्रदान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उद्योजकता, सामाजिक बांधिलकी, शासकीय जनजागृती, ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी प्रगती इंटरप्राइसेस, नागपूरचे संचालक तथा मोहम्मद रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशनचे सचिव गौरव वसंतराव नासरे यांना प्रतिष्ठेच्या 'समाजरत्न पुरस्कार-२०२६'ने सन्मानित करण्यात आले. जिरो माईल राष्ट्रीय हिन्दी साप्ताहिक अखबार व जिरो माईल फाउंडेशन, नागपूर यांच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त हॉटेल तुली इम्पेरियल येथे जिरो माईल आयकॉन अवॉर्ड-२०२६ व विशेषांक विमोचन सोहळा पार पडला. यात माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे आणि माजी मंत्री रमेश बंग यांच्या हस्ते नासरे यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास रामनारायण मिश्रा, सुनील दत्त शर्मा, रवि बोराटकर, डॉ. निलेश अग्रवाल, आचार्य पं. सुधीर शास्त्री, सुदर्शन चक्रधर, डॉ. महेंद्र सेठ, विकास मिश्रा, डॉ. प्रवीण डबली, डॉ. संजीवनी चौधरी, चंदू गलगलीकर व आशीष खरे, संयोजक जिरो माईलचे मुख्य संपादक डॉ. आनंद शर्मा, कार्यकारी संपादक विद्या शर्मा व ज्येष्ठ लेखापाल मोहम्मद सलीम उपस्थित होते.

## 'संघ साहित्य—समग्र चिंतन प्रवाह'वर ३ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय परिषद

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघ साहित्य—समग्र चिंतन प्रवाह, काव्य धारा—राष्ट्र साधना के सौ वर्ष' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत संघ साहित्यावरील चर्चासत्र, साहित्यिक परस्पर संवाद तसेच अखिल भारतीय कविसंमेलन आदी विविध कार्यक्रमांचा समावेश आहे. वनामती सभागृह, व्ही.आय.पी. रोड, धरमपेठ येथील सकाळी १० वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारक प्रमुख स्वांत रंजन यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. साहित्य परिषदेचे अखिल भारतीय अध्यक्ष डॉ. सुशील चंद्र त्रिवेदी, अ. भा. संघटन मंत्री मनोज कुमार, अ. भा. महामंत्री डॉ. पवनपुत्र बादल, अ. भा. उपाध्यक्ष डॉ. दिनेश प्रताप सिंह आणि अ. भा. संयुक्त महामंत्री डॉ. नीलम राठी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

परिषदेत 'विभाजन' या विषयावर प्रा. सूर्यप्रसाद दीक्षित (उत्तर प्रदेश), 'और देश बंट गया' विषयावर दिवाकर हेगडे (कर्नाटक), 'सेवा आपदा' विषयावर प्रा. मिलिन जमातिया (त्रिपुरा) तसेच 'पंच परिवर्तन' विषयावर प्रा. स्वानंद गजानन पुंड (महाराष्ट्र) हे विचार मांडणार आहेत.

दुसऱ्या सत्रात कविसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले असून त्यात आंतरराष्ट्रीय कवी गजेंद्र सोलंकी व विनीत चौहान, डॉ. कीर्ती काळे, प्रो. चारू कालरा, अखिल भारतीय काव्य साधना संयोजक डॉ. प्रवीण आर्य, पंकज पांडे, मुंबई (कल्याण) येथील कवी प्रवीण देशमुख व अनंत सप्रे, नागपूरचे राष्ट्रीय कवी दयाशंकर तिवारी मौन, शैलेश चौथाईवाले आणि रामकृष्ण सहस्त्रबुद्धे सहभागी होणार आहेत. साहित्य, संस्कृती आणि विचारांच्या या समृद्ध सोहळ्यात साहित्य चर्चा, परिसंवाद, परस्पर संवाद आणि अखिल भारतीय कविसंमेलनाच्या माध्यमातून संघ साहित्याच्या विविध पैलूंवर चिंतन करण्यात येणार आहे. साहित्य भारतीच्या विदर्भ प्रांतातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, सभासद आणि साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य विदर्भ प्रांतचे अध्यक्ष चंद्रकांत लाखे, कार्याध्यक्ष डॉ. चंद्रशेखर भुसारी, महामंत्री विनय माहूरकर आणि संयोजक जगदीश थपलियाल यांनी केले आहे.

## राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरिता निवड : महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय भंडारबोडीच्या विद्यार्थिनींचे उज्ज्वल यश; गावात भव्य प्रभातफेरी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक तालुक्यातील कवी कालिदास शिक्षण संस्था, नगरधन द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, भंडारबोडी येथील कु. गुडिया बलिवान खरकाटे आणि कु. आयुषी गजानन मेश्राम या विद्यार्थिनींची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरिता निवड झाली आहे. या दैदिप्यमान यशामुळे शाळेच्या आणि परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. दोन्ही विद्यार्थिनींनी विभागीय पातळीवरील कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ही राज्यस्तरीय निवडीची संधी पटकावली आहे. विद्यार्थिनींच्या या कौतुकास्पद यशाबद्दल दिनांक २८/०९/२०२६ रोजी शाळेच्या वतीने गावामध्ये उत्साहात प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीदरम्यान ग्रामस्थांनी ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थिनींचे विशेष अभिनंदन व कौतुक केले. या यशाबद्दल कवी कालिदास शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापीका सौ. भारती अ. बारापात्रे, भूषण ना. कडुकर (क्रीडा शिक्षक), सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने दोन्ही विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.



विद्यार्थिनींच्या या यशात त्यांच्या कठोर परिश्रमासोबतच क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन व बलीवान खरकाटे व गजानन मेश्राम या पालकांचे सहकार्य लाभले. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतही त्या उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास मुख्याध्यापकांनी व्यक्त केला असून त्यांना पुढील वाटचालीस व स्पर्धेकरिता हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सात दिवसात पूर्ण करावे : जिल्हाधिकारी आशीर्वाद

### जबाबदारी व समन्वयाने काम करण्याचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील बाधित तालुक्यांमधील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे येत्या सात दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज दिले. ही प्रक्रिया तात्काळ, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर फुटाणे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रदीप उबाळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी प्रज्ञा गोडघाटे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे आदी उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

यंदाच्या खरीप हंगामात पर्जन्याची तूट आणि इतर घटकांमुळे बाधित झालेल्या नागपूर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये ट्रिगर - १ अंतर्गत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजीचा शासन निर्णय व २७ सप्टेंबर २०२६ च्या आयुक्तालयाच्या सूचनांनुसार सर्व बाधित क्षेत्राचे पंचनामे येत्या सात दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तालुकास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी तातडीने समन्वय बैठक घेऊन



ग्रामस्तरावरील संबंधित यंत्रणांची पथके गठित करावीत. सदर पथकांमध्ये आवश्यकतेनुसार तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक अथवा कृषी सेवक व कोतवाल यांचा समावेश करून व पंचनाम्यांची कार्यवाही तात्काळ सुरू करावी. ही प्रक्रिया केवळ औपचारिक स्वरूपाची न राहता वस्तुनिष्ठ, पारदर्शक, अचूक व प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीवर आधारित असावी, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना अत्यंत जबाबदारीने आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. पंचनामे करताना एकही पात्र व प्रत्यक्ष बाधित शेतकरी वंचित राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात यावी. त्याचबरोबर अपात्र अथवा वस्तुस्थितीशी विसंगत प्रकरणांचा समावेश होणार नाही याचीही खातरजमा करावी. याबाबत संबंधित तहसीलदार व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी यांनी जबाबदारी पार पाडावी असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. जिल्हास्तरावर पंचनामा कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवाल संकलित करण्यात यावा. ज्या तालुक्यांची पंचनाम्याच्या प्रक्रियेचि गती तुलनेने कमी असेल अशा तालुक्यांचा विशेष आढावा घेण्याच्या सूचना त्यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांना केल्या.

पंचनाम्याची कार्यवाही करताना कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी सुधारित प्रपत्राचा अनिवार्य वापर करण्यात यावा. संबंधित प्रत्येक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतीची पाहणी करावी तसेच जीपीएस समन्वयांक आणि छायाचित्रांसह क्षेत्रीय पुरावा संकलित करणे बंधनकारक असून पंचनाम्यामध्ये शेतकऱ्यांचा 'अँग्रीस्टॅक फार्मर आयडी' प्रामुख्याने नोंदवण्यात यावा आणि तो उपलब्ध नसल्यास पयार्यी ओळख म्हणून आधार क्रमांकाची नोंद घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. पिकांच्या ३३ टक्के पेक्षा कमी अथवा जास्त झालेल्या नुकसानीची अचूक वर्गीकरण करून नोंद घेणे, बँक खात्याचा तपशील (बँकेचे नाव, शाखा, आयएफएससी कोड, खाते क्रमांक) अचूक भरणे आणि पंचनाम्यावर शेतकऱ्याची स्वाक्षरी घ्यावी. महसूल, कृषी आणि पंचायत समिती स्तरावरील यंत्रणांनी आपापल्या जबाबदाऱ्या समन्वयाने पार पाडाव्या, यात काही विसंगती उद्भवल्यास दूर करावी. तसेच अंतिम संकलित अहवाल विहित अ, ब, क, ड प्रपत्रात विभागीय आयुक्तांमार्फत कृषी आयुक्तालयाकडे तात्काळ सादर करण्याचे निर्देश आशीर्वाद यांनी दिले.

दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने करण्यात येणारी ही कार्यवाही अत्यंत संवेदनशील व कालमर्यादित असल्याने सर्व संबंधित विभागांनी सर्वोच्च प्राधान्याने ही प्रक्रिया पार पाडण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## एसपींच्या कार्यकाळाच्या चौकशीसाठी प्रशासकीयस्तरावर पाठपुरावा

### राष्ट्रपती सचिवालयाचे निवेदन सामान्य प्रशासन विभागाकडे; पंतप्रधान कार्यालयाकडूनही तक्रारीची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांच्या तीन वर्षांच्या कार्यकाळातील प्रशासकीय निर्णयांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याच्या मागणीने आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू झाला आहे. राष्ट्रपती सचिवालयाकडे सादर केलेले निवेदन महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आले असून, पंतप्रधान कार्यालयाकडूनही तक्रारीची नोंद करण्यात आली आहे.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र प्रदेशचे समन्वयक अरुण महाजन यांनी या प्रकरणी विविध स्तरांवर निवेदने सादर केली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या तक्रार निवारण प्रणालीवरील मूळ तक्रार अद्याप प्रगतीपथावर असून, अंतिम निर्णय किंवा निवारण अहवाल प्राप्त झालेला नाही.

**सामान्य प्रशासन विभागाकडे निवेदन**

राष्ट्रपती सचिवालयाकडून निवेदन महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. पोर्टलवरील माहितीनुसार, प्रकरणाची नोंद झाली असून संबंधित अधिकाऱ्याकडे कार्यवाहीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मात्र, चौकशी सुरू झाल्याची किंवा अंतिम निर्णय झाल्याची माहिती उपलब्ध नाही.

**निलंबन, वेतनवाढ आणि पदस्थापनांची चौकशी मागणी**

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील निलंबनात्मक कारवाया, विभागीय चौकशी, वेतनवाढ स्थगिती आणि बदली-




पदस्थापनांच्या निर्णयांचा अभिलेखांच्या आधारे आढावा घेण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील नियुक्तीबाबतची तक्रार, शासकीय वाहनांचा व पोलीस मनुष्यबळाचा कथित वापर आणि सेवा शस्त्राशी संबंधित घटनेचीही पडताळणी करण्याची मागणी आहे.

अधिकाऱ्यांच्या खासगी निवासस्थानी पाळीव कुत्र्याच्या अंत्यविधीदरम्यान तीन फैरी झाडल्याचा आरोपही निवेदनात नमूद करण्यात आला आहे. या घटनेची सत्यता, संबंधित आदेश आणि शस्त्र व दारूगोळ्याच्या नोंदी तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्व बाबी अद्याप आरोप असून, त्यांची स्वतंत्र चौकशी होणे अपेक्षित आहे.

**तीन वर्षांनंतर प्रशासकीय आढाव्याची मागणी**

हर्ष ए. पोद्दार यांची ३० ऑगस्ट २०२३ रोजी नागपूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती झाली होती. ऑगस्ट २०२६ मध्ये त्यांच्या पदस्थापनेची तीन वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर, बदली बंधनकारक असल्याचा दावा न करता, त्यांच्या कार्यकाळाचा स्वतंत्र आढावा घेऊन भविष्यातील पदस्थापनेबाबत सक्षम प्राधिकरणाने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित विभागांकडून अद्याप चौकशीचे आदेश किंवा अंतिम निर्णय जाहीर झालेला नाही. तक्रारीतील सर्व बाबींची निष्पक्ष व अभिलेखाधारित तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी अरुण महाजन यांनी केली आहे.

## मनपा शाळांमधील कंत्राटी शिक्षक भरती प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्यामुळे आणि त्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने, नागपूर महानगरपालिका शाळांमध्ये राबविण्यात येणारी तात्पुरत्या स्वरूपातील कंत्राटी शिक्षक भरती प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली आहे. मनपा शाळांमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता दिनांक १०.०५.२०२७ पर्यंतच्या उर्वरित ८ महिन्यांच्या कालावधीसाठी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत कंत्राटी शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविण्यात येत होती. मात्र, लागू झालेल्या आचारसंहितेच्या नियमांचे पालन करत प्रशासनाने ही भरती प्रक्रिया तूर्तास थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील सर्व मनपा शाळांच्या मुख्याध्यापकांनी या निर्णयाची गांभीयार्ने नोंद घ्यावी. आचारसंहिता लागू असेपर्यंत शाळा स्तरावर या भरती संदर्भात कोणतीही पुढील कार्यवाही किंवा हालचाल करू नये, असे स्पष्ट निर्देश शिक्षणाधिकारी श्री. अमित भदाणे यांनी आले आहेत.




आदर्श आचारसंहितेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आणि निवडणूक कार्यक्रम समाप्त झाल्यावर, या भरती प्रक्रियेचे सुधारित व पुढील वेळापत्रक आवश्यक त्या बदलांसह शाळांना कळविण्यात येणार आहे. या कालावधीत इच्छुक उमेदवारांनी कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून शाळा स्तरावरून सर्व संबंधित व इच्छुक उमेदवारांना या स्थगितीबाबत व सद्यस्थितीची आवश्यक माहिती त्वरित देण्याचे निर्देशही शाळांना देण्यात आले आहेत.

## सातासमुद्रापार गणरायाचा जागर; नेदरलँड्समध्ये 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, विशेष**

**ॲमस्टरडॅम** : महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला गणेशोत्सवाचा उत्साह सातासमुद्रापार नेदरलँड्समध्येही तितक्याच आपुलकीने अनुभवायला मिळाला. युथॉर्न येथे सलग दुसऱ्या वर्षी 'वि द पीपल' यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' मध्ये २०० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मराठमोळी परंपरा, भारतीय संस्कृती आणि विविध देश-प्रांतांतील लोकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सोहळा केवळ गणेशोत्सव न राहता माणसांना जोडणारा आनंदाचा उत्सव ठरला.

मूळचे नागपूरकर आणि गेल्या १३ वर्षांपासून नेदरलँड्समध्ये वास्तव्यास असलेले अमित काशीकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आकाराला आला. परदेशात राहताना आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ जपण्याबरोबरच विविध पार्श्वभूमीच्या लोकांना एकत्र



आणावे, संवाद आणि मैत्रीची नवी दारे उघडावीत, या भावनेतून त्यांनी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर २०२५ मध्ये 'वि द पीपल'ची स्थापना केली.

'एकत्र येणे, योगदान देणे आणि समाजासाठी काहीतरी चांगले घडवणे' या विचारातून संस्था विविध उपक्रम राबवते. भारतीय आणि इतर समुदायांमध्ये संवाद वाढवणे, संस्कृतीची ओळख जपणे आणि प्रत्येकाला आपलेपणाची जागा मिळावी, यासाठी काम करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. त्याच भावनेचे सुंदर प्रतिबिंब 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल'मध्ये पाहायला मिळाले.

अमित काशीकर म्हणाले, भारतीय परंपरा पुढे नेण्याबरोबरच गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध संस्कृतींना एकत्र आणणे, हा आमचा प्रयत्न आहे. या उत्सवात वसुधैव कुटुंबकम् ही भावना प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा जो विचार रुजवला, त्याची एक छोटीशी अनुभूती आम्हाला या आयोजनातून मिळाली.

उत्सवाची सुरुवात शाडूच्या गणेशमूर्तीच्या विधिवत स्थापनेने झाली. जर्मनीहून विशेष आलेल्या ओम ढोल-ताशा पथकाने ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला मानवंदना दिली. त्यानंतर गणेशपूजा आणि सामूहिक आरतीने वातावरण भक्तिमय झाले. शेकडो जणांनी एकसुरात आरती म्हणत गणरायाचा जयघोष केला.

यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कलाविष्कार, स्पर्धा आणि मनोरंजक उपक्रमांनी उत्सवात रंग भरला. भारतातील विविध प्रांतांतील खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना उपस्थितांनी संस्कृतींच्या विविधतेचाही आनंद लुटला. मूळच्या नागपूरच्या आणि वि द पीपलशी जोडलेल्या अनुजा कुंजलवारयांनी उत्साहपूर्ण सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. त्यांना शर्मिला यांनीही समर्थ साथ दिली.

**आव्हानांतून अधिक घट्ट झाले नाते**

यंदाचा उत्सव अनेक अनपेक्षित आव्हानांसह पार पडला. नियोजनातील बदल, पडद्यामागची धावपळ आणि



अनेक अडचणी असूनही आयोजक, स्वयंसेवक, कलाकार, सहकारी आणि स्टॉलधारक यांनी एकमेकांच्या साथीने प्रत्येक आव्हानावर मात केली. कदाचित याच अनुभवामुळे यंदाचा उत्सव सर्वांसाठी अधिक जिव्हाळ्याचा ठरला.

या अनुभवाविषयी अमित काशीकर म्हणाले, बाप्पाने यंदा आम्हाला एकच संदेश दिला असावा—एकत्र राहा, विश्वास कायम ठेवा आणि पुढे चालत राहा. उत्सवाच्या दिवशी कुटुंबे आनंदाने येताना, मुले उत्साहाने सहभागी होताना, जुने मित्र पुन्हा भेटताना आणि नवी नाती जोडली जाताना पाहिले, तेव्हा पडद्यामागील सर्व कष्ट सार्थकी लागल्याची भावना झाली.

या सोहळ्यामागे वि द पीपलच्या संचालक मंडळातील शीतल काशीकर, मनीष गुप्ता, रोहित झांब आणि त्रिप्ती गुप्ता यांच्यासह अनिश, सचिन गुप्ता, आकृती, अनुजा कुंजलवार, प्रशांत, हरिका, शर्मिला, चंद्रमौली आणि सहकाऱ्यांची मेहनत होती. अक्षय इजदार यांनी आपल्या छायाचित्रणातून या दिवसातील आनंदाचे आणि आपुलकीचे क्षण कायमचे जपून ठेवले. गणरायाच्या निमित्ताने एकत्र आलेली कुटुंबे, उत्साहाने सहभागी झालेली मुले, वेगवेगळ्या संस्कृतींतून आलेले मित्र आणि नव्याने जोडली गेलेली माणसे या सगळ्यांनी या उत्सवाला एक वेगळीच ऊब दिली.

माती महाराष्ट्राची, भूमी नेदरलँड्सची आणि भावना मात्र संपूर्ण मानवतेची, हा होता 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' परंपरेची मुळे जपत, नव्या भूमीत मैत्रीची नवी पालवी फुलवणारा आणि 'वसुधैव कुटुंबकम्' जगणारा हा उत्सव अनेकांच्या मनात बाप्पाच्या आशीर्वादासारखी एक सुंदर आठवण ठेवून गेला.

थोडक्यात

## सेवा संकल्प अभियान निमित्ताने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे तथा समाज कल्याण, नागपूर तसेच सामाजिक वनीकरण कार्यालय, रामटेक यांच्यावतीने सेवा संकल्प अभियान अंतर्गत ट्रू नर्सिंग कॉलेज,मनसर - कांद्री च्या प्रांगणात मा. जितेंद्र ढाले वनपरिक्षेत्र अधिकारी, मनसर सर्कल यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती कांचन श्रीरंग, वनपाल मनसर सर्कल यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. रामटेक समतादूत राजेश राठोड यांनी उपस्थितांकडून सामूहिकपणे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची शासकीय प्रतिज्ञा वदवून घेतली.त्यानंतर वड, पिंपळ, जांभूळ, फणस व उंबर या प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी नर्सिंगच्या विद्यार्थिनींना वृक्षाची संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली त्यात कोमल कावळे व निकिता वंजारी यांना जांभूळ वृक्ष संगोपनाची जबाबदारी, पायल कुंभलकर व प्राची देशमुख यांना पिंपळ वृक्ष संवर्धनाची जबाबदारी अनामिका पारधी व इशिका नेवारे यांना उंबर वृक्षाची जबाबदारी, सानिया खान कृतिका नेवारे यांना फणस वृक्षाची जबाबदारी, कल्याणी बाविस्कर शारदा कठौते यांना वड वृक्षाची जबाबदारी देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन रामटेक तालुका समतादूत राजेश राठोड यांनी केले तर आभार व व्यवस्थापन मौदा समतादूत ओमप्रकाश डोले यांनी केले. याप्रसंगी सुरेश भोयर वन मजूर तसेच शिक्षक वृंद निकिता गुरनुले, समीक्षा गायकवाड, श्वेता दिवटे व स्नेहलता सिंग उपस्थित होते.

## जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे पालक मेळावा उत्साहात संपन्न

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह नियमित उपस्थिती, गुणवत्ता व सुरक्षिततेवर पालकांशी संवाद



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, नवेगाव येथे पालक मेळाव्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मनोज बोपचे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच किशोर लिल्हारे, शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष राजेश तांडेकर, उपाध्यक्ष पुष्पा बोपचे, पोलीस पाटील डीलेश्र्वरी दमाहे, महात्मागांधी तंटामुक्ति समिती अध्यक्ष हेतराम बोपचे, उपाध्यक्ष शंकरदास रामटेके, रामजी दमाहे, कारेलाल दमाहे, शाला व्यवस्थान समिति सदस्य सुनीता लिल्हारे, टेकेश्वरी पटले, मुख्याध्यापक एस.एम. दसरिया, पदवीधर शिक्षक एस जी मच्छिरके, आर.एस.बसोने, सहायक शिक्षक योगेश चंदनकर, स्वयसेवक राकेश दमाहे, स्वयसेविका साक्षी भंडारी उपस्थित होते.पालकांच्या उपस्थितीत सरस्वती माता व क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेला मल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व गुणवत्ता, नियमित उपस्थिती, अध्ययनातील अडचणी, गृहपाठ व अभ्यासातील सातत्य, वाचन-लेखन व गणित विषयातील प्रगती, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्य, स्वच्छता, शालेय शिस्त, मोबाईलचा योग्य वापर, पौष्टिक आहार आणि सुरक्षितता याबाबतही पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांची प्रगती अधिक चांगली होण्यासाठी पालकांनी शिक्षकांना सहकार्य करावे तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे नियमित लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी पालक-शिक्षक यांच्यातील समन्वय व सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. पालकांनीही शाळेच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. पालक मेळाव्यामुळे शाळा आणि पालक यांच्यातील संवाद अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने यांनी केले.

## सुपर वूमन वेलफेअर जिल्हा गोंदियातर्फे गुरूश्री अवॉर्ड वितरण



**दै. सिंहवाणी वृतत, सालेकसा**

सुपर वूमन वेलफेअर जिल्हा गोंदियाव्दारा आयोजित गुरूश्री अवॉर्ड-२०२६ मध्ये आठ तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक व इतर क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांची वैचारीक माहिती करून निवड करण्यात आली. मंचावर उपस्थित शैक्षणिक संस्थांचे मान्यवर संचालक यांचे स्वागत सुपर वूमनव्दारे करण्यात आले. ही संस्था गोंदिया जिल्हात स्वास्थ्य,शिक्षा,पर्यावरण व उद्यमिता यावर काम करते भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रात कार्य करू असे संचालक प्रमोद ल.गुडधे यांनी सांगीतले. २० महिलांना घेऊन काम सुरू केले. त्यांच्या कामाची जसजशी व्याप्ती वाढत गेली तसतसी व्यासपीठाचे नाव व सुपर वूमन सदस्य पाच हजारच्या जवळपास झाले, असे संचालिका प्राची प्र.गुडधे यांनी सांगीतले. त्यानंतर शिक्षकांचा सत्कार समारोह सुरू झाला. आमगांव तालुक्यातील सत्कारमूर्ती के. के. इंग्लीश प्रायमरी स्कूल आमगांव येथील हर्षा सतिशचंद्र साखरकर तसेच बबिता अग्रवाल, राकेश रामटेके आणी बाकी तालुक्यातील शिक्षकांचा पण सत्कार करण्यात आला.

# महावितरणच्या नाट्यस्पर्धेतून कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना भरारी

### नागपुरात आंतर परिमंडळीय नाट्यस्पर्धेचा दिमाखदार शुभारंभ





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दैनंदिन कामाप्रती उत्साह वाढविण्यासोबतच कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी महावितरणच्या नाट्यस्पर्धेचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. कलावंतांना अंतर्गत प्रेरणा मिळावी यासाठी रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या सादरीकरणाला भरभरून दाद द्यावी, असे आवाहन महावितरण नागपूर परिक्षेत्राचे प्रभारी प्रादेशिक संचालक तथा नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले. नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित महावितरणच्या प्रादेशिक आंतर परिमंडळीय नाट्यस्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे होते. अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, चंद्रपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता हरिश गजबे तसेच परीक्षक महेश पातुरकर, विवेक खेर आणि मिनाक्षी बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटक दत्तात्रय बनसोडे यांनी अशा स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांना वर्षभर उत्साहाने काम करण्यासाठी नवी ऊर्जा मिळते असे सांगत कलाकारांना प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. अमरावतीचे मुख्य अभियंता दिलीप दोडके व चंद्रपूरचे मुख्य अभियंता हरिश गजबे यांनी प्रेक्षकांनी कोणताही ताण न घेता या नाटकांचा निकोप आनंद घ्यावा, अशा शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन अमित पेढेकर, स्वाती फटे आणि अर्चना पाटील यांनी केले.

स्पर्धेचा पहिलाच दिवस रंगभूमीप्रेमींसाठी एक समृद्ध वैचारिक आणि भावनिक पर्वणी ठरला. पहिल्याच दिवशी रंगमंचावर सादर झालेल्या 'चिंधी बाजार' आणि 'गुलाम' या दोन दर्जेदार नाटकांनी उपस्थितांची तुफान दाद मिळवली. सशक्त कथासूत्र, कलाकारांचा ताकदीचा अभिनय, चपखल नेपथ्य आणि आशयाला साजेसे संगीत यांच्या बळावर दोन्ही प्रयोगांनी पहिल्याच दिवशी स्पर्धेची रंगत उत्तरोत्तर वाढवली.

दिवसाच्या पहिल्या सत्रात अकोला परिमंडळातर्फे हेमंत मानकर लिखित 'चिंधी बाजार' हे उपरोधात्मक नाटक सादर करण्यात आले. आजच्या धावपळीच्या आणि व्यापारी युगात मानवी भावना, नाती आणि मूलभूत मूल्यांचा कसा मोलहीन व्यवहार झाला आहे, याचे दाहक वास्तव या नाटकाने मांडले. गंभीर विषय असूनही कलाकारांनी विनोदाचे अचूक टायमिंग साधत समाजातील ढोंगीपणावर मार्मिक बोट ठेवले. आजच्या जगात माणसाने नैतिक मूल्यांचा बाजार मांडणे थांबवले पाहिजे, हा अंतर्मुख करणारा संदेश या नाटकातून देण्यात आला.

दुसऱ्या सत्रात अमरावती परिमंडळातर्फे ज्येष्ठ नाटककार शं. ना. नवरे (शन्ना) लिखित 'गुलाम' या लोकप्रिय नाटकाचा प्रयोग रंगला. माणूस स्वतःच्याच भावना, विकार आणि विचारांचा कसा गुलाम बनतो, या मानवी मानसिकतेचा सूक्ष्म वेध या नाटकाने घेतला. सुशिक्षित मध्यमवर्गीय कौटुंबिक पार्श्वभूमीत पात्रांमधील ताणतणाव, प्रेम आणि नात्यांमधील तडजोड अतिशय संवेदनशीलतेने उलगडण्यात आली. नात्यांमधील गैरसमज दूर करून संयमाने जगल्यास माणूस या मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकतो, हा सुंदर विचार नाटकाने मांडला. पहिल्याच दिवशी सादर झालेल्या दोन्ही प्रयोगांना प्रेक्षक व परीक्षकांकडून भरभरून दाद मिळाली असून महावितरण कर्मचाऱ्यांमधील सुप्त नाट्यगुणांचे आणि रंगमंचीय शिस्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## कोदामेंढीच्या ग्रामपंचायतीच्या इतिहासातील ग्रामपंचायत कार्यालयऐवजी बस स्थानकात कोरम अभावी तहकूब न होणारी सायं. ६ वाजता घेण्यात येणारी विशेष ग्रामसभा, आचारसंहितेमुळे झाली तहकूब!

**किशोर साहू : मौदा-** कोदामेंढी बसस्थानकावरील अतिक्रमणाबाबत चर्चा व आठवडी बाजार सीमांकन करणे या दोन विषयावर आज सोमवार (ता.२८ सप्टेंबर) ला कोदामेंढीच्या ग्रामपंचायतीच्या इतिहासातील ग्रामपंचायत कार्यालय ऐवजी बसस्थानकात सायं.६ वाजता विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. कोरम अभावी विशेष ग्रामसभा तहकूब होत नाही. मात्र पदवीधर मतदारसंघाचे निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून जिल्ह्यात आचारसंहिता सुरू आहे. आचारसंहितेमुळे ही ऐतिहासिक ग्रामसभा तहकुब झाली असून, आचारसंहिता संपल्यानंतर ही विशेष ग्रामसभा बस स्थानक चौकातच होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सोशल मीडियावरील आपल्या स्टेटसवर ठेवली आहे. आचारसंहिता सुरू असताना विशेष ग्रामसभेचे पत्र ग्रामपंचायत ने का काढले? अपर तहसील कार्यालय मंजूर झालेल्या कोदामेंढी येथे आचारसंहितेचे भंग होत असेल तर तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीतही असा प्रकार तर सुरू नाही ना? असा सवाल तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित प्रशासन विभागासमोर मांडला आहे.




## संरक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका अत्यंत महत्त्वाची : डॉ. टेसी थॉमस

### इंजिनीयर्स फोरमच्यावतीने अभियंता दिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रचंड माहिती, वेळेची मर्यादा आणि वेगाने बदलणाऱ्या युद्धाच्या परिस्थितीत अचूक व विश्वासार्ह निर्णय घेण्यासाठी अक हे अत्यंत प्रभावी माध्यम बनले आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचीच्या सेंटर फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड रोबोटिक्स प्रयोगशाळेत विकसित केलेले अक टूल हे आकाश, ब्राह्मोस आणि अग्नि यांसारख्या क्षेपणास्त्रांच्या गायडन्स, नेव्हिगेशन आणि GPS मधील चुकीचा डेटा हटवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात असे प्रतिपादन डॉ. टेसी थॉमस यांनी केले.

अभियंता दिन निमित्ताने इंजिनीयर्स फोरमच्यावतीने सोमवारी भारताची मिसाईल वूमन म्हणून परिचित असलेल्या एरोनॉटिकल इंजिनिअर डॉ. टेसी थॉमस यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

वनामती हॉल झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर होत्या.

मंचावर इंजिनिअर्स फोरम, नागपूरचे अध्यक्ष पी. के. कुलकर्णी, कार्याध्यक्ष एस. आर. गंधेवार, सचिव के. सी. तायडे तसेच कोषाध्यक्ष व्ही. के. अलकारी उपस्थित होते.

डॉ. टेसी थॉमस म्हणाल्या, एलसीए लढाऊ विमानांमध्ये वैमानिकाच्या सुरक्षेसाठी आणि त्वरित निर्णयासाठी चार पट सुरक्षा व प्रेडिक्टिव्ह अल्गोरिदमचा वापर केला जात आहे. आजच्या काळात अक, सेन्सर्स आणि कम्युनिकेशन नेटवर्कला एकत्र जोडून देशाची संरक्षण प्रणाली अधिक सक्षम व मजबूत केली जात आहे.

आधुनिक युद्धतंत्रज्ञानामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वायत्त यंत्रणांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरत आहे. लढाऊ विमानांमधून योग्य शस्त्रांची निवड करण्यापासून ते मानवरहित ड्रोनच्या थेट स्वायत्त निर्णयांपर्यंत सर्वच टप्प्यांवर अक-आधारित प्रणालींचा वापर वेगाने वाढत आहे. त्यांनी यावेळी भारताच्या वाढत्या संरक्षण क्षमतेवर प्रकाश टाकला. आतापर्यंत भारत जागतिक तंत्रज्ञानाच्या ब्लूप्रिंट्सवर काम करत आला असला तरी, 'मेक इन इंडिया' व 'डिझाइन इन इंडिया'च्या माध्यमातून आता भारताने स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करून स्वावलंबी होण्याची गरज असल्याचे डॉ. मनाली क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जीवनपटावर अभियंता पी. पी. देशपांडे यांनी प्रकाश टाकला. यावेळी अभियंता दिन २०२६ स्मरणिकाचे विमोचन करण्यात आले. त्यानंतर सावनेर येथील मूकबधिर निवासी शाळेला देणगीचा धनादेश अभियंता एस. आर. गंधेवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप शिरखेडकर यांनी केले. प्रास्ताविक पी. के. कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन के. सी. तायडे यांनी केले.

## लता मंगेशकर जयंतीनिमित्त लता मंगेशकर युनिव्हर्सिटीमध्ये मानवंदना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतरत्न, ज्येष्ठ गायिका आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, नागपूर अंतर्गत एन.के.पी. साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे लता मंगेशकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली व मानवंदना देण्यात आली. यावेळी युनिव्हर्सिटीचे वाईस चान्सलर डॉ काजल मित्रा, संस्थेचे कोषाध्यक्ष सुधीर देशमुख, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. सजल मित्रा, वाईस डीन व वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ अनुज तिवारी, डॉ एकनाथ चौधरी, डॉ सुश्रुत फुलारे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी लता मंगेशकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

लता मंगेशकर यांनी आपल्या अद्वितीय स्वरांनी भारतीय संगीताला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या अमूल्य योगदानामुळे त्या भारतीयांच्या मनात सदैव अजरामर राहतील. त्यांच्या नावाने स्थापन झालेल्या लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, नागपूरच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्यसेवा आणि संशोधनाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. लता मंगेशकर यांच्या जीवनातील साधेपणा, समर्पण, शिस्त आणि कार्याप्रती असलेली निष्ठा ही भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना समाजसेवा आणि मानवतेच्या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य करण्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रपुरमध्ये १,८०९ कोटी रुपयांचा एकात्मिक स्टील प्रकल्प उभारणार

### श्री राज आयर्न अँड स्टीलचा महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करार, एआयडीच्या पुढाकाराने विदर्भात मोठी स्टील गुंतवणूक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

चंद्रपूर जिल्ह्यात १,८०९ कोटी रुपयांची मोठी औद्योगिक गुंतवणूक होणार असून, हैदराबाद येथील श्री राज आयर्न अँड स्टील प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडतर्फे गोंडपिपरी येथे एकात्मिक स्टील प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

या प्रस्तावित गुंतवणुकी संदर्भातील सामंजस्य करारावर आज मुंबईतील मंत्रालयात श्री राज आयर्न अँड स्टील प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र सरकारदरम्यान स्वाक्षरी करण्यात आली. विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि या भागात गुंतवणूक आकर्षित करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी)च्या माध्यमातून ही गुंतवणूक होत आहे.

या प्रकल्पातून सुमारे १,२०० प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा असून हा प्रकल्प २०२९-३० दरम्यान सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

या करारानुसार महाराष्ट्र सरकार संबंधित विभागांच्या प्रचलित धोरणे, नियम व नियमानुसार कंपनीला आवश्यक परवानग्या, नोंदणी, मंजुरी, परवाने तसेच आर्थिक सवलती मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार आहे.

या वेळी महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बलगन, श्री राज आयर्न अँड स्टील प्रॉडक्ट्स प्रा. लि.चे संचालक श्री किशन अग्रवाल, संचालक श्री अनुराग अग्रवाल, एआयडीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कपिल चांद्रायण आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूरचे अध्यक्ष श्री मधुसूदन रूंगटा उपस्थित होते.

विदर्भात औद्योगिक गुंतवणूक सुलभ करण्यासाठी एआयडी संभाव्य गुंतवणूकदारांशी संवाद साधणे, त्यांना संबंधित शासकीय यंत्रणांशी जोडणे तसेच प्रकल्पांची स्थापना आणि विस्तारासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे काम करत आहे. श्री राज आयर्न अँड स्टीलची ही गुंतवणूक विदर्भात नवीन उद्योग आणि गुंतवणूक आकर्षित करण्याच्या या प्रयत्नांमधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

थोडक्यात

## महावितरणच्या वीजयंत्रणेत खासगी व्यक्तींकडून कामे करून घेतल्यास थेट बडतर्फीसारखी कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणच्या वीजयंत्रणेमधील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलणे, तांत्रिक दुरुस्ती, वीजबिल वसूली किंवा मीटर काढणे यासारखी कामे विद्युत सुरक्षा नियमांचे पालन करून करण्याची पूर्णतः जबाबदारी तारमार्ग संवर्गातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची आहेत. अशी तांत्रिक व जोखमीची कामे करवून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारे खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करू नये. असे प्रकार आढळून आल्यास व विद्युत अपघात झाल्यास संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध बडतफीसारखी कठोर कारवाई करण्यात येईल असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक काढून क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंत्यांना याबाबत खातरजमा करण्याचे आदेश दिले आहेत. महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेचे सुरक्षित संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे हे प्रत्येक संबंधित अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. वीज यंत्रणेमध्ये प्रत्यक्ष कामे करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तारमार्ग संवर्गामध्ये प्रधान तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांवर नादुरुस्त वितरण रोहित्र बदलणे, डीओ फ्यूज बदलणे, विद्युत वाहिनीमधील बिघाड शोधणे, वीज पुरवठ्याच्या ग्राहक तक्रारी सोडवणे, वीजबिलांची वसूली करणे आणि थकबाकीदार ग्राहकांचे मीटर काढून आणणे यासारख्या कामांची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

तथापि, महावितरणचे काही तारमार्ग कर्मचारी ही कामे स्वतः करण्याऐवजी खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून घेत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे. याबाबतच्या तक्रारी मुख्यालयस्तरावर प्राप्त झाल्या आहेत. महावितरणच्या वीजयंत्रणेतील कामांसाठी खासगी व अनधिकृत व्यक्तींचा वापर करणे अत्यंत गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत व्यक्तींकडे पुरेसे तांत्रिक ज्ञान व सुरक्षेचे प्रशिक्षण नसते. त्यामुळे विद्युत व यांत्रिक अपघात घडून संबंधित खासगी व्यक्ती तसेच कर्मचाऱ्यांचा अपघात होण्याची मोठी शक्यता आहे. याशिवाय वीज ग्राहक व महावितरणच्या मालमत्तेचे नुकसान सहन करावे लागते. 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी (मेझर्स रिलेटिंग टू सेफ्टी ॲण्ड इलेक्ट्रिक सप्लाय) रेग्युलेशन्स २०२३' मधील नियम ३ नुसार केवळ अधिकृत व्यक्तीच वीज वितरण सेवेशी संबंधित कामे करू शकते किंवा विद्युत वाहिन्या व उपकरणांवर काम करण्यास पात्र असते. त्यामुळे महावितरणकडून अधिकृतपणे नामनिर्देशित न केलेल्या किंवा अपात्र खासगी व्यक्तीस वीज यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचे काम करण्यास परवानगी देणे अथवा त्याच्याकडून काम करून घेणे हे पूर्णपणे बेकायदेशीर व अनधिकृत कृत्य आहे. तसेच महावितरणच्या सेवाविनियमांनुसार ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीत मोडते.

या सर्व गंभीर बाबींची दखल घेत महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी एका परिपत्रकाद्वारे कठोर निर्देश जारी केले आहेत. अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून काम केल्याचे किंवा अशा प्रकारच्या गैरवर्तणुकीमुळे कोणतीही दुर्घटना, अपघात किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित प्रकरणी तात्काळ चौकशी करण्यात यावी असे निर्देश संचालक श्री. औंढेकर यांनी दिले आहेत. चौकशीअंती दोषी ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध सेवाविनियमातील तरतुदींनुसार बडतर्फी किंवा सेवासमाप्ती यासारखी कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. यासोबतच क्षेत्रिय कार्यालयातील मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात वीज वितरणाच्या कामांमध्ये कुठल्याही परिस्थितीत खासगी व अनधिकृत मनुष्यबळाचा वापर होत नाही याची वेळोवेळी खातरजमा करावी असे आदेशही संचालक धनंजय औंढेकर यांनी दिले आहेत.

## आनंद निकेतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे २४ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे,प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रशांत वाघ तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गोपाल वरूटकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. धनश्री पंचभाई, डॉ. सुरेश राठोड आणि प्रा. नीरज आत्राम यांची उपस्थिती लाभली.

मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी प्रमुख वक्ता डॉ. प्रशांत वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना, उद्दिष्टे आणि सामाजिक कायार्तील तिचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजाशी आपले नाते दृढ करून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. गोपाल वरूटकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कुणाल काळे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी, श्रमप्रतिष्ठा, नेतृत्वगुण आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी या मूल्यांची जडणघडण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुरेश राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रणिता दानव यांनी केले, तर आभार प्रदर्शन साक्षी गुरनुले यांनी केले.

# पीडब्लूडी अभियंत्याचा व्हीआयपी विश्रामगृहावर 'कब्जा' !

**निवासस्थान म्हणून वापर, दुरुस्तीसाठी हिवाळी अधिवेशनाच्या निधीचा खर्च : विकास ठाकरे, २०२६ च्या हिवाळी अधिवेशनाच्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १०० कोटींची मागणी केली, कामांवर देखरेखीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची मागणी**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नागपूर विभाग क्रमांक-१ अंतर्गत असलेल्या व्हीआयपी विश्रामगृहाचा अधीक्षक अभियंत्यांचे अधिकृत निवासस्थान म्हणून वापर करून त्यावर राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी मंजूर निधीतून खर्च करण्यात आल्याचा गंभीर आरोप आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे.

ठाकरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त केलेल्या कागदपत्रांच्या आधारे या प्रकरणाची तक्रार तयार करून आज मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याकडे सादर केली.

काही महिन्यांपूर्वीही ठाकरे यांनी हिवाळी अधिवेशनासाठी मंजूर निधीशी संबंधित गैरव्यवहार उघडकीस आणून कारवाईची मागणी केली होती. त्या तक्रारीची सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गंभीर दखल घेतली होती आणि कार्यकारी अभियंत्यासह संबंधित काही अभियंत्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या, असे ठाकरे यांनी म्हटले आहे.

आता समोर आलेल्या या नव्या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधित तत्कालीन व विद्यमान अभियंते तसेच कंत्राटदारांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ठाकरे यांनी मंत्र्यांकडे केली आहे.

तक्रारीत ठाकरे यांनी म्हटले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत त्यांनी नागपूरच्या सिव्हिल लाइन्स परिसरातील रवीनगर येथे अधीक्षक अभियंत्यांच्या शासकीय बंगल्यावर करण्यात आलेल्या कामांची माहिती मागविली होती. त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-१ ने २०२३ मध्ये करण्यात आलेल्या कामांच्या कार्यादेशांच्या प्रती उपलब्ध करून दिल्या.

या कागदपत्रांमधून अधीक्षक अभियंत्यांचे शासकीय निवासस्थान म्हणून वापरली जाणारी इमारत प्रत्यक्षात रवीनगर येथील बंगला क्रमांक ४७/१ असलेले व्हीआयपी विश्रामगृह असल्याचे समोर आल्याचा दावा ठाकरे यांनी केला आहे. ठाकरे यांनी तक्रारीत नमूद केल्यानुसार, २३ नोव्हेंबर २०२३ आणि २१ डिसेंबर २०२३ रोजी जारी करण्यात आलेल्या तीन कार्यादेशांद्वारे एकूण ९२,८६,१२४ रुपयांची कामे अधीक्षक अभियंत्यांच्या शासकीय निवासस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या या इमारतीवर करण्यात आली.

या कामांमध्ये फॉल्स सिलिंगची दुरुस्ती, स्नानगृहाचे नूतनीकरण, दरवाजे व खिडक्या बदलणे, संरक्षक भिंतीची उंची वाढविणे, छताची दुरुस्ती, वाहनतळासाठी शेड उभारणे, संरचनात्मक मजबुतीकरण, प्लिंथ प्रोटेक्शनचे वॉटरप्रूफिंग तसेच उद्यानातील पायवाटेची कामे यांचा समावेश असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे, या कार्यादेशांमध्ये संबंधित कामे राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाशी संबंधित असल्याचा स्पष्ट उल्लेख असल्याचेही ठाकरे यांनी सांगितले.

व्हीआयपी विश्रामगृहाचा अधीक्षक अभियंत्यांचे अधिकृत निवासस्थान म्हणून वापर करणे आणि त्याच इमारतीवर हिवाळी अधिवेशनासाठी मंजूर निधी खर्च करणे हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. केवळ २०२३ या एका वर्षातच सुमारे ९३ लाखांचा खर्च झाल्याचे कागदपत्रांतून दिसते. यापूर्वी आणि त्यानंतरही या इमारतीवर तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील इतर अभियंत्यांच्या बंगल्यांवर हिवाळी अधिवेशनाच्या निधीतून कोट्यवधी रुपये खर्च झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे आवश्यक आहे, असे ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने सुमारे १०० कोटींचे अंदाजपत्रक सादर केले असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर, हिवाळी अधिवेशनाच्या निधीतून होणाऱ्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी एक स्वतंत्र समिती स्थापन करावी. या समितीत स्थानिक आमदार, जिल्हाधिकारी कार्यालयाचा प्रतिनिधी, केंद्र शासनाच्या एखाद्या संस्थेतील स्थापत्य अभियंता तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते यांचा समावेश असावा, अशी मागणी ठाकरे यांनी केली आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी मंजूर होणाऱ्या निधीतून करण्यात येणाऱ्या प्रत्येक कामावर ही समिती बारकाईने देखरेख ठेवावी, निविदा प्रक्रियेत आणि प्रत्यक्ष कामांमध्ये पूर्ण पारदर्शकता राखली जावी तसेच सार्वजनिक निधीचा योग्य आणि आवश्यक कामांसाठीच वापर होईल, याची खात्री करावी, अशी मागणीही आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे.

## पारंपरिक वाद्यांच्या गजरात आमगाव पोलीस ठाण्याच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

***शासनाच्या ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन; पोलीस निरीक्षक नीलकंठ कुकडे यांच्या उपस्थितीत मुख्य मार्गावरून मिरवणूक, माता बोडीत विधिवत विसर्जन***



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

गणेशोत्सवाच्या उत्साहाला भक्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची जोड देत आमगाव पोलीस ठाण्यात विराजमान गणरायाला रविवारी भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. शासनाच्या निर्देशांचे पालन करत यावेळी डीजेचा वापर पूर्णपणे टाळण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

आमगाव पोलीस ठाण्यात गणेशोत्सवानिमित्त विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाचे विसर्जन रविवारी करण्यात आले. पोलीस निरीक्षक नीलकंठ कुकडे यांच्या उपस्थितीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गणरायाची पूजा-अर्चा करून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात केली. यावेळी पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**पारंपरिक वाद्यांनी मिरवणुकीत भक्तिमय वातावरण**

गणपती बाप्पाची मिरवणूक आमगाव शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. डीजेच्या दणदणाटाऐवजी पारंपरिक वाद्यांच्या तालावर मिरवणूक पुढे सरकत होती. ढोल-ताशांच्या गजरासह गणरायाचा जयघोष करण्यात येत असल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. शासनाने ध्वनिप्रदूषणाबाबत घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याचा संदेश देत पोलीस विभागाने स्वतःच्या गणपती विसर्जन मिरवणुकीतही डीजेचा वापर टाळला. त्यामुळे उत्सव साजरा करताना नियमांचे पालन आणि पर्यावरणपूरक व शांततापूर्ण उत्सवाचा आदर्श यावेळी पाहायला मिळाला.

**माता बोडीत गणरायाला अखेरचा निरोप**

मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक तुकडोजी चौक येथील माता बोडी येथे पोहोचली. याठिकाणी गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी ह्यगणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याह्णचा जयघोष करत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

गणरायाच्या विसर्जनावेळी पोलीस विभागाकडून शिस्त व शांतता राखण्यात आली. गणेशोत्सव काळात नागरिकांनी ध्वनिप्रदूषण टाळावे, शासनाच्या नियमांचे पालन करावे आणि उत्सव शांततेत साजरा करावा, असा संदेशही या विसर्जन मिरवणुकीतून देण्यात आला.

**शिस्त, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश**

पोलीस ठाण्याच्या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत डीजेचा वापर न करता पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्यात आल्याने गणेशोत्सवातील धार्मिक उत्साहासोबतच सामाजिक जबाबदारीचेही दर्शन घडले.

## पाणीटंचाईबाबत दीर्घकालीन उपाययोजना व नियोजन करावे : जिल्हाधिकारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने तात्पुरत्या उपाययोजनांसोबत दीर्घकालीन व कायमस्वरूपी उपाययोजनांचे नियोजन करून पाणीटंचाईग्रस्त व टँकरवर अवलंबून असलेली गावे टँकरमुक्त करण्याच्या दिशेने कालबद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज आढावा बैठकीत दिले. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर फुटाणे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रदीप उबाळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, इतर संबंधित तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा यावेळी सविस्तर आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हे पाणीटंचाई विषयाचे नोडल अधिकारी असून या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी संबंधित विभाग व क्षेत्रीय यंत्रणांशी समन्वय साधून जिल्ह्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी सर्वसमावेशक कृती आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. विनायक महामुनी यांनी वारंवार पाणीटंचाई उद्भवणारी गावे व नियमित टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणाऱ्या गावांसाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता कायमस्वरूपी उपाययोजनांचे नियोजन करता येईल सांगितले. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी अशा गावांची स्वतंत्रपणे ओळख करून गावनिहाय आवश्यक कामे, प्रस्तावित उपाययोजना, अंदाजित खर्च, उपलब्ध पाणीस्त्रोत, विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्था आणि आवश्यक निधी यांचा समावेश असलेला सविस्तर गावनिहाय कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांना दिले.

## 'अश्विन नवरात्र -२०२६'च्या पूर्वतयारीबाबत प्रशासकीय आढावा बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**
**मिलिंद गाडेकर**



श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथे अश्विन नवरात्र उत्सव झ २०२६ च्या अनुषंगाने भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या विविध प्रशासकीय व मूलभूत सुविधांच्या नियोजनाबाबत आज दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय विभागांचे अधिकारी, संस्थान प्रशासन व विश्वस्त मंडळ यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस महानगरपालिका आयुक्त विपीन इटनकर, विनायक महामुनी, पोलीस उपायुक्त (झोन क्र. ६) धुमाळ, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रविण माहिरे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) आदित्य मिरखेलकर, तहसीलदार गणेश जगदाळे तसेच महाजेनकोचे अधिकारी, मंदिर प्रशासन, महावितरण अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, नगरपंचायत मुख्याधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी व महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक व संपूर्ण बैठकीचे संचालन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण लिखाणकर यांनी केले. तसेच संस्थानचे अध्यक्ष अजय विजयवर्गी, सचिव दत्तूजी समरितकर व कोषाध्यक्ष नंदूबाबू बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती.

**बैठकीतील प्रमुख निर्णय व निर्देश**

अश्विन नवरात्र उत्सवाच्या कालावधीत मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन बैठकीमध्ये खालीलप्रमाणे महत्त्वाचे निर्देश देण्यात आले :

**१. पार्किंग व्यवस्था :**
भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र व नियोजित पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. पार्किंग ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देऊन वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**२. वाहतूक व्यवस्था :**
नवरात्र उत्सवाच्या कालावधीत वाहनांची वाढती वर्दळ लक्षात घेऊन वाहतूक नियमन, मार्गाचे नियोजन व आवश्यक ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

**३. पाणीपुरवठा व्यवस्था :**
भाविकांसाठी पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध राहावा तसेच आवश्यक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

**४. स्वच्छता व्यवस्था :**
मंदिर परिसर, दर्शन मार्ग, पार्किंग परिसर, शौचालये व भाविकांच्या वर्दळीच्या ठिकाणी नियमित स्वच्छता ठेवण्यासाठी विशेष स्वच्छता व्यवस्था कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला.



**५. प्रकाश व्यवस्था :**
मंदिर परिसर, दर्शन मार्ग, पार्किंग क्षेत्र, प्रवेशद्वारे व इतर आवश्यक ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात यावी. उत्सवाच्या कालावधीत विद्युत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले.

**६. आरोग्य व्यवस्था :**
भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी प्राथमिक उपचार केंद्र, वैद्यकीय पथक व आपत्कालीन आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आरोग्य विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या.

**७. सुरक्षा व्यवस्था :**
मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी पोलीस व सुरक्षा कर्मचारी तैनात करण्याचे तसेच गर्दीचे नियोजन व नियंत्रण करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

**८. वीजपुरवठा व विद्युत व्यवस्था :**
नवरात्र उत्सवाच्या कालावधीत अखंड व सुरक्षित वीजपुरवठा राहण्यासाठी महावितरण व संबंधित विद्युत विभागाने आवश्यक पूर्वतयारी करावी, तसेच तातडीच्या परिस्थितीसाठी पयार्यी व्यवस्था सज्ज ठेवावी, याबाबत निर्देश देण्यात आले.

**९. विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय :**
महसूल विभाग, आरोग्य विभाग, पोलीस विभाग, वाहतूक विभाग, महानगरपालिका/नगरपंचायत, ग्रामपंचायत, महावितरण, महाजेनको व मंदिर प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने काम करून उत्सवाच्या कालावधीत भाविकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**१०. भाविकांना सुलभ दर्शन व सुरक्षित वातावरण :**
भाविकांना शिस्तबद्ध, सुरक्षित व सुरळीत दर्शन मिळावे यासाठी दर्शन रांगा, प्रवेश-निर्गमन मार्ग, गर्दी नियंत्रण व आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन व्यवस्था प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याकरिता सेवाधारी नेमण्यात येणार याची माहिती देण्यात आली.

बैठकीमध्ये सर्व संबंधित विभागांनी आपल्या अखत्यारितील कामांचे पूर्वनियोजन करून आवश्यक त्या उपाययोजना वेळेत पूर्ण कराव्यात, तसेच उत्सवाच्या कालावधीत उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचा तातडीने निपटारा करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश देण्यात आले.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांच्यावतीने अश्विन नवरात्र उत्सव - २०२६ यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक प्रशासन व संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com    Epaper : epaper.sinhvani.com

# नुकसान पोहोचवायला संपूर्ण वातावरण आहे गुलजार, आपल्या हृदयाची स्वत:च काळजी घ्याल

जागतिक हृदय दिन विशेष



डॉ. प्रितम भि. गेडाम

आजच्या आधुनिक युगात मनुष्याने भौतिक सुखाच्या मागे लागून आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याशी तडजोड केली आहे. जिकडे पाहावे तिकडे अनैतिकता, स्वार्थ आणि फसवणुकीचे साम्राज्य पसरलेले आहे. कोणी आपल्याशी उंच आवाजात बोलले तरी आपण त्याला उलट उत्तर देतो किंवा वाद घालतो; परंतु कोणी भेसळ, प्रदूषण आणि अस्वच्छतेच्या माध्यमातून आपल्याला महागड्या, असाध्य आणि जीवघेण्या आजारांची भेट दिली, तरी आपण त्याविरोधात साधा हुंकारही भरत नाही, कारण आपण आपली मानसिकताच तशी बनवून घेतली आहे. आपण केवळ प्रत्यक्ष स्वरूपात निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत थोडेफार जागरूक असतो; मात्र अप्रत्यक्षपणे जाणाऱ्या आपल्या जीवाची आपल्याला कधीच काळजी नसते.

वाढत्या मानवी लालसेने पृथ्वीवर दूषित वातावरणाचे चक्रव्यूह निर्माण केले आहे, ज्याने संपूर्ण जीवसृष्टीला घातक आजारांनी जखडले आहे, ज्यामुळे अकाली होणाऱ्या मृत्यूंमध्ये प्रचंड वाढ झाल्याने भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे; परंतु माणूस हे समजून घ्यायलाच तयार नाही. अशा लोकांच्या चुकीची शिक्षा इतर निष्पापांनाही आपला जीव गमावून भोगावी लागते.

दूषित वातावरणामुळे आज वेगाने जीवघेणे आजार वाढले आहेत. कर्करोग, हृदयरोग, स्ट्रोक या आजारांची नावे आता आपल्याला दररोजच ऐकायला मिळतात. एखादा पूर्णपणे निरोगी मनुष्य, जो व्यसन करत नाही, नेहमी पौष्टिक आहार घेतो आणि उत्तम निरोगी जीवनशैलीचा अवलंब करतो, अशा व्यक्तीलाही अनेकदा घातक आजारांमुळे जीव गमवावा लागत आहे; कारण निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांची भरमार, भेसळखोरी आणि दूषित वातावरणात श्वास घेण्यास तो मजबूर आहे. आपल्या चटोरी जिभेच्या चवीच्या लालसेपोटी जनावरांनाही खाण्यायोग्य नसतील असे खाद्यपदार्थ आपण मोठ्या चवीने खातो आणि संपूर्ण शरीराला कचरापेटी बनवतो. खराब कोलेस्ट्रॉल तर आता आपल्या शरीराचा एक भागच बनले आहे. आपल्या देशात तर गोड पदार्थ, मैदा, मसाला, तेल आणि नमकीन यांच्याशिवाय दैनंदिन दिनचर्याच पूर्ण होत नाही; परंतु हे खाद्य अत्यंत घातक आहेत. वाढता लठ्ठपणा, आळस आणि दीर्घकाळ बसून करावे लागणारे काम या समस्या अधिक वाढवत आहेत. आजारपणामुळे वाढणारा आर्थिक ताण आणि मानसिक अस्वस्थताही आपल्या शरीराला नुकसान पोहोचवते.

प्रगत देशांनी ज्या खाद्यपदार्थांवर किंवा उत्पादनांवर बंदी घातली आहे, तीदेखील आपल्या देशात सर्रास विकली जातात. जीवघेण्या रसायनांचा खाद्यपदार्थांमध्ये वापर आणि बनावट खाद्यपदार्थ बाजारपेठा गजबजवत आहेत. उत्पादने किंवा खाद्यपदार्थांवरील मुदतची तारीख खोडून नवीन तारीख टाकून ते पुन्हा विकले जाण्याच्या घटना आपण अनेकदा पाहतो. लालची व्यापारी किंवा दुकानदार केवळ आपल्या एका रुपयाच्या फायद्यासाठीही निष्पापांच्या जीवाशी खेळण्यास घाबरत नाहीत. तुकाराम मुंडे महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदावर कार्यरत आहेत. त्यांनी भेसळखोरी, बनावट खाद्यपदार्थ आणि निकृष्ट खाद्यपदार्थांवर बंदी घालण्यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या जीवघेण्या खाद्यपदार्थांच्या बाजाराला आळा बसला आहे. जरा विचार करा, या कारवाईपूर्वी सर्रास सुरू असलेल्या या व्यवसायामुळे रसायनांपासून तयार केलेले बनावट दूध, त्यापासून तयार केलेले पनीर, मिठाई आणि विविध खाद्यपदार्थ यांच्या माध्यमातून आतापर्यंत किती निष्पाप लोकांना घातक आजारांनी ग्रस्त करून अकाली मृत्यूच्या दाढेत ढकलले असेल. निरोगी राहण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात अशा मेहनती आणि कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे.



आजच्या वातावरणात हृदयाशी संबंधित आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या सर्वोच्च पातळीवर आहे. दोन दशकांपूर्वीपर्यंत असे विकार श्रीमंत आणि वृद्धांच्या वाट्याला येतात असे मानले जात होते. परंतु आज लहान मुलेदेखील हृदयविकारामुळे जीव गमावत आहेत. आजकाल लहान-लहान शालेय मुले खेळता-खेळता अचानक चक्कर येऊन पडतात आणि डॉक्टर सांगतात की हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. इतकी लहान मुलेही हृदयरोगामुळे जीव गमावतात, हे खरोखरच आश्चर्यकारक वाटते; कारण आपल्या आजूबाजूचे वातावरणच इतके दूषित झाले आहे.

जागतिक हृदय महासंघानुसार, दरवर्षी वायुप्रदूषणामुळे ७० लाख लोकांचा मृत्यू होतो. वायुप्रदूषणाशी संबंधित मृत्यूंपैकी ५० टक्के मृत्यू हृदयरोग आणि स्ट्रोकमुळे होतात. स्वयंपाक करण्यासाठी आग पेटवल्यामुळे निर्माण होणाऱ्या धुराच्या संपर्कात आल्याने दरवर्षी ३८ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. दरवर्षी उच्च कोलेस्ट्रॉलमुळे ४४ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. लॅन्सेटमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अहवालात सांगण्यात आले आहे की, अंदाजे १० कोटी लोक अशा हृदयविकारांसह जीवन जगत आहेत, ज्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. यामध्ये जीव गमावणारे बहुतांश लोक गरीब असतात. वर्ष २०२३ मध्ये जगभरात २३ लाख मुले जन्मजात हृदयरोगासह जन्माला आली. अमेरिकेत गुंतागुंतीच्या जन्मजात हृदयरोगासाठी प्रति रुग्ण आयुष्यभराचा सरासरी खर्च २.१ मिलियन अमेरिकी डॉलर आहे, तर आयुष्यभराचा एकूण आर्थिक परिणाम ३.३५ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपेक्षाही अधिक आहे.

ग्लोबल अलायन्स फॉर क्रॉनिक डिसीजच्या मते, वर्ष २०२१ मध्ये हृदय आणि रक्तवाहिन्यांच्या आजारांमुळे २.०५ कोटी लोकांचा मृत्यू झाला, जे जगभरात झालेल्या एकूण मृत्यूंच्या ३२ टक्के आहे. हृदयरोगामुळे होणाऱ्या ८५ टक्के मृत्यूंपैकी हार्ट अटॅक आणि स्ट्रोक ही प्रमुख कारणे आहेत. यापैकी ७५ टक्कयांहून अधिक मृत्यू कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात. देशात दरवर्षी हृदय आणि हृदय-वाहिन्यांशी संबंधित आजारांमुळे जवळपास २८ - ३१ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. वर्ष २०२४ मध्ये हृदयरोगामुळे झालेल्या एकूण मृत्यूंची संख्या ३,१६५,१७२ होती. भारतात हृदयविकाराच्या जवळपास ७० टक्के रुग्णांकडे आरोग्य विमा नाही आणि ते आर्थिक सुरक्षिततेपासून वंचित आहेत. या आजारामुळे जवळपास ३२ टक्के रुग्ण आणि ३६ टक्के कुटुंबांच्या मासिक उत्पन्नात मोठी घट होते. १७.७ टक्के कुटुंबांना वैद्यकीय खर्च भागवण्यासाठी अनिश्चित काळासाठी कर्ज घ्यावे लागते किंवा मालमत्ता विकावी लागते.

हृदय कमजोर करणाऱ्या गोष्टींपासून सदैव दूर राहा. कोणत्याही प्रकारचे व्यसन जीवघेणे ठरू शकते. वजन, उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवा. पौष्टिक आहार घ्या. मानसिक ताणाकडे दुर्लक्ष करू नका, मानसिक आरोग्याची काळजी घ्या. आनंदी वातावरण निर्माण करा, समाधानी राहायला शिका. ८ तासांची पूर्ण झोप घ्या, दररोज व्यायाम करा, निरोगी छंदांना जोपासा. खोट्या दिखाव्यापासून दूर राहा. ज्यांना भावनांची कदर नाही, त्यांच्यापासून दूर राहा. लोकांकडून अपेक्षा ठेवू नका, आधुनिक जीवनशैलीचा त्याग करा. गोड पदार्थ, मसाला, मैदा, तेल, नमकीन, पॅकबंद खाद्यपदार्थ, कोल्ड्रिंक आणि अत्याधिक प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ शरीराचे नुकसान करतात. खाद्यपदार्थांची निवड चवीप्रमाणे नव्हे, तर त्यांच्या पोषणमूल्यांकडे पाहून करा.

प्लास्टिकपासून बनवलेल्या पिशव्या, भांडी आणि बाटल्यांचा वापर त्वरित बंद करा. खाद्यपदार्थांसाठी प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर विषासमान आहे. नेहमी स्वच्छतेची काळजी घ्या. आधुनिक साधन सामग्री वरील अवलंबित्व कमी करा. आळसाचा त्याग करा. सतत बसून राहण्याचे काम टाळा; शक्य नसेल तर थोडा ब्रेक घ्या. सामाजिक परोपकाराची जाणीव ठेवा. पर्यावरणाला नुकसान पोहोचवणाऱ्यांचा कडाडून विरोध करा, कारण निरोगी राहण्यासाठी सर्वप्रथम शुद्ध ऑक्सिजन, पौष्टिक आहार आणि स्वच्छ पाणी आवश्यक आहे, हे कधीही विसरू नका. जेव्हा कोणी प्रदूषण, भेसळखोरी, अस्वच्छता, झाडांची तोड, अतिक्रमण, गोंगाट किंवा भ्रष्टाचार करतो, तेव्हा एक गोष्ट लक्षात ठेवा की तो अप्रत्यक्षपणे आपला जीव घेत आहे. कीटकांप्रमाणे आपले जीवन वाया घालवू नका. जीवन पुन्हा मिळत नाही; आरोग्य हीच खरी संपत्ती आहे.

**- (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)- ०८२३७४१७०४१**

## दैनिक सिंहवाणी वृत्त 'आरती संग्रह घरोघरी'



मौदा तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या पारशिवनी तालुक्या अंतर्गत येत असलेल्या निलज येथील रामटेक, मौदा, पारशिवनी तालुक्यातील प्रसिद्ध रील स्टार गोविंदा पाहुणे विदर्भातील सुप्रसिद्ध गणेशपुर भंडारा येथील गणेश उत्सव मंडळाच्या कार्यक्रम आटपून तारसा कन्हान मार्गे निलज येथे जात असताना हिवरा येथे दैनिक सिंहवाणी वृत्तचे मौदा प्रतिनिधी किशोर साहू यांनी आरती संग्रह पुस्तिका भेट दिली. याप्रसंगी हिवरा येथील सामाजिक कार्यकर्ते लेखराम गणवीर, गांगणेर येथील सामाजिक कार्यकर्ते रवी गुजरकर उपस्थित होते.

## चाचेर येथे दोन महत्वाच्या सिमेंट रस्त्यांच्या कामाची पाहणी व चौकशी पूर्ण, लवकरच कामाला सुरुवात

### ग्रामपंचायत चाचेरच्या यशस्वी प्रयत्नांना यश, शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांना होणार मोठा फायदा

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**

ग्रामपंचायत चाचेरच्या ठराव पत्रानुसार (ठराव क्र. १६/१० दि. ०५/०२/२०२६) मंजूर झालेल्या दोन महत्वाच्या रस्त्यांच्या कामाबाबत नुकतीच प्रशासनाकडून सविस्तर पाहणी व चौकशी करण्यात आली.




बाजार चौक लक्ष्मीनारायण मंदिर ते हनुमान नगर सिमेंट रस्ताः हा रस्ता ५.५ मीटर रुंदीचा असून दोन्ही बाजूला १-१ मीटर नाली बांधकामासह मंजूर झाला आहे.

तसेच चाचेर ते नेरला पांदण रस्ताः या शेतरस्त्याचे सिमेंटिकरण करण्याबाबत सुद्धा पाहणी व चौकशी करण्यात आली. या दोन्ही कामांची सुरुवात लवकरच होणार असून, हे रस्ते झाल्यानंतर शेतकरी वगार्ला शेतात जाणे-येणे सोपे होईल, शाळेतील मुलांना चिखलातून जावे लागणार नाही आणि सर्व नागरिकांसाठी दळणवळण सोयीचे होईल.

ग्रामपंचायतच्या प्रयत्नाने हे दोन्ही रस्ते मंजूर झाले आहेत.यापूर्वी दि. २७/०६/२०२६ रोजी सरपंच लुंबिनी कलारे यांनी महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे याबाबत प्रस्ताव सादर केला होता, त्यानुसार दि. ३१/०८/२०२६ रोजी MMGSY अंतर्गत अधिकाऱ्यांनी गावात येऊन ट्रांजिट वॉक केला होता, हे विशेष!

या प्रसंगी सरपंच लुंबिनी महेश कलारे, गंगाधर बादुले, कृष्णा टीकले, ग्रामपंचायत सदस्य शैलेश कोपरकर, माजी सरपंच महेश कलारे,माजी उपसरपंच प्रकाश वाकलपुडी, सुरेंद्र टेंभरे, योगेश निनावे, चंद्रकला धोटे, सुमन सोमकुवर, सविता जांभरे, नलू दरवई, रोशनी किरपान, ममता चौरे, स्नेहा पायतोडे, भाजपा किसान आघाडी जिल्हा ( रामटेक ) ग्रामीण मंत्री विनोद कोपरकर, अशोक बावनकुळे, ज्ञानेश्वर नाकाडे, प्रकाश काळे, अशोक गडे, नरेश बादुले, दिलीप गडे, पुरुषोत्तम आंबीलढुके,मारुती साखरवाडे, गेंदलाल मोहने, उत्तम पाटील, देवा अढाऊ, मोरेश्वर किरपान, चिंटू सोमनाथे, लीलाधर दरवई, शुभम गडे व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते. लवकरच या कामाची प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## 'सेवा से संकल्प अभियान' अंतर्गत खात-रेवराल जि.प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्रांना भेट, सेविका व मदतनीसांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा से संकल्प अभियान' अंतर्गत राधा मुकेश अग्रवाल यांच्या पुढाकाराने खात - रेवराल जि प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या घोटमुंढरी, ढोलमारा, आष्टी, महालगाव, देवमुंढरी आणि खात येथील अंगणवाडी केंद्रांना भेट देण्यात आली.

यावेळी अंगणवाडी सेविका तसेच मदतनीस यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अंगणवाडी केंद्रातील विविध उपक्रमांची पाहणी करून सेविका व मदतनीसांशी संवाद साधण्यात आला.



तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींशी संवाद साधून योजनांच्या माध्यमातून मिळालेल्या लाभाबाबत त्यांचे अनुभव जाणून घेण्यात आले.

या उपक्रमाला शुभांगी मेंढे समाजसेविका तथा प्रभारी नागपूर जिल्हा भाजपा महिला आघाडी, प्रीती मानमोडे अध्यक्ष महिला आघाडी नागपूर जिल्हा, निशा सावरकर माजी अध्यक्ष जि.प. नागपूर, राधा अग्रवाल माजी सदस्य जि.प. नागपूर, डॉ. नीलिमा घाटोळे महामंत्री जिल्हा महिला आघाडी भाजपा, कांचन दंढारे भाजपा तालुकाध्यक्ष महिला आघाडी मौदा यांची उपस्थिती होती. यावेळी संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस, विविध योजनांचे लाभार्थी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या कार्याचा गौरव करण्यासोबतच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला.

## जीएसटी बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी धुनिसिंगानी तर सचिवपदी प्रीतम बत्रा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स बार असोसिएशन, नागपूरच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. १३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड सवार्नुमते करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी अँड. मुकुंद एल.धुनिसिंगानी, उपाध्यक्षपदी सीए रितेश आर. मेहता, सचिवपदी सीए प्रीतम बत्रा, सहसचिवपदी सीए गर्वित जी. पालिवाल, तर कोषाध्यक्षपदी सीए दीपक रहांगडाले यांची निवड झाली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून अँड. अनिल बी.





देशपांडे, सीए जय एम. पोपटांनी, सीए आशिष एम. मुंधडा आणि टीपी. फरहाद जिवानी यांची निवड करण्यात आली. तसेच वाढदिवस उत्सवाचे प्रभारी म्हणून टीपी. तेनेंद्र चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जीएसटी बार असोसिएशनच्या माध्यमातून वस्तू व सेवा करासंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर नियमितपणे अभ्यास मंडळे (स्टडी सर्कल), गटचर्चा आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले जातात. जीएसटी तसेच अन्य अप्रत्यक्ष कर कायद्यांच्या अंमलबजावणी दरम्यान कर व्यवसायिकांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत केंद्र व राज्य जीएसटी विभागाकडे वेळोवेळी निवेदने व प्रतिनिधित्व करण्यात येते. या संघटनेमध्ये सनदी लेखापाल (सीए), अधिवक्ते तसेच कर सल्लागार व कर व्यवसायिकांचा समावेश आहे.